## देशात १७ सप्टेंबरपासून सेवा संकल्प अभियान



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षाकडून महिनाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी बुधवारी (दि.९) सेवा संकल्प अभियानाची घोषणा केली. हे अभियान १७ सप्टेंबरपासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये महिनाभरानंतर पूर्ण होईल. ७ ऑक्टोबर २००१ रोजी पंतप्रधान मोदींची लोकप्रतिनिधी म्हणून सार्वजनिक कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या दिवशी त्यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारली होती. १७ सप्टेंबर हा पंतप्रधान मोदींचा वाढदिवस सेवा दिवस म्हणून साजरा करण्यात येणार असून या दिवशी देशभर रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाईल. भाजपकडून या अभियानांतर्गत १२ विविध श्रेणींमध्ये कार्यक्रम घेतले जाणार आहेत.

अंतरंग
‘ॲपआधारित टॅक्सीचालकांची माहिती तीन महिन्यांत द्या’/२
जीवन पुन्हा नाही; आनंदाने जगण्याची कला शिका!/४
‘एमसीए’च्या परीक्षेत रायगडचे चार पंच उत्तीर्ण/८

# गणेशोत्सवात अवजड वाहतुकीला बंदी

### मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर निर्बंध जारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या व नंतर येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित आणि सुरळीत व्हावा तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६वर १६ टन व त्यापेक्षा अधिक वजनक्षमतेच्या अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. परिवहन विभागामार्फत हे बंदी आदेश जारी करण्यात आले आहेत.

गणेशोत्सवपूर्व तयारी व मूर्तींचे आगमन लक्षात घेऊन ११ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२.०१ वाजल्यापासून १५ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत निर्बंध लागू असतील. यात १६ टन व त्यापेक्षा अधिक असलेली जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीॲक्सल, ट्रेलर, ट्रक, लॉरी आदींची वाहतूक पूर्णतः बंद राहणार आहे.

पाच दिवसांच्या गणपती विसर्जनासाठी १८ सप्टेंबर रोजी



सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत १६ टन किंवा त्यापेक्षा अधिक वजनक्षमतेच्या सर्व जड-अवजड वाहनांची वाहतूक बंद राहणार आहे.

सात दिवसांच्या गणपतीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जनासाठी व काही अंशी परतीच्या प्रवासासाठी १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत आणि २० सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत १६ टन व त्यापेक्षा अधिक असलेली जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीॲक्सल, ट्रेलर, ट्रक, लॉरी आदींची वाहतूक पूर्णतः बंद राहणार आहे.

अनंत चतुर्दशीला १२ दिवसांच्या गणपती विसर्जनासाठी व परतीच्या प्रवासासाठी २५ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते २६ सप्टेंबर रात्री ८ वाजेपर्यंत या मार्गावरील याच प्रकारच्या अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध लागू राहणार आहेत.

### अत्यावश्यक सेवांना सूट

या निर्बंधांमधून जेएनपीटी बंदर व जयगड बंदर येथून आयात-निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर, मेडिसिन, लिक्विड मेडिकल ऑक्सिजन, अन्नधान्य, भाजीपाला, नाशवंत माल आदी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना सूट देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, आपत्ती व्यवस्थापन व इतर अत्यावश्यक सेवा पुरविणारी वाहने निर्बंधातून वगळण्यात आली आहेत. याशिवाय रस्ता रूदीकरण, दुरूस्तीची कामे तसेच त्यासाठी आवश्यक साहित्य, माल आदींची ने-आण करणाऱ्या वाहनांना हे निर्बंध लागू राहणार नाहीत.

# जमिनीचे व्यवहार होणार हायटेक!

### महाराष्ट्रात लवकरच ‘डेल्टा ॲक्ट’ : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकार जमीन आणि इतर अचल मालमत्तेचे डिजिटायझेशन व टोकनायझेशन करण्यासाठी ब्लॉकचेन-आधारित प्रणाली विकसित करीत आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित महाराष्ट्र डिजिटायझेशन अँड एक्सचेंज ऑफ लँड टोकन ॲसेट ॲक्ट (डेल्टा ॲक्ट) पुढील चार ते पाच महिन्यांत आणला जाण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ग्लोबल फिटनेक फेस्टच्या अनुषंगाने ते एका वृत्तवाहिनीशी बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या प्रस्तावित कायद्यासाठीच्या शिफारशी कार्यकारी समितीसमोर सादर करण्यात आल्या आहेत. ब्लॉकचेन-आधारित टोकन्सद्वारे जमीन आणि इतर अचल मालमत्तेचे डिजिटल स्वरूप तयार करता येईल, अशी एक नियंत्रित यंत्रणा निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य सरकार आता या प्रणालीच्या रचनेवर काम करत आहे.



आम्ही आता या कायद्याच्या रचनेला मूर्त रूप देत आहोत, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, या कायद्याची निर्मिती काळजीपूर्वक केली जात असून त्यासाठी केंद्र सरकार, वित्तीय संस्था आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात मोठ्या समन्वयाची आवश्यकता असेल.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढे सांगितले की, जमीन आणि इतर अचल मालमत्तांचे डिजिटायझेशन व टोकेनायझेशन करण्यासाठी असा कायदा तयार करणारे भारतातील पहिले राज्य बनण्याचे महाराष्ट्र सरकारचे उद्दिष्ट आहे. अचल मालमत्तांच्या ब्लॉकचेन-आधारित टोकेनायझेशनसाठी कायदेशीर चौकट विकसित करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या यापूर्वीच्या निर्णयाचाच हा एक भाग आहे.

#### संस्था आणि तज्ज्ञांचे सहकार्य

प्रस्तावित कायद्यासाठी राज्य सरकार सेबी, एनएसई, आणि बीएसई यांसारख्या शेअर बाजारातील संस्था आणि नियामक संस्थांमधील तज्ज्ञांची मदत घेत आहे. नियमन, डिजिटल मालमत्तेचे व्यवहार आणि मालमत्तेचे अधिकार व वित्तीय बाजारपेठा यांच्यातील परस्परसंबंध यांसारख्या मुद्द्यांवर राज्य सरकार काम करत असताना सेबी, एनएसई आणि बीएसई यांचा सहभाग विशेष महत्त्वाचा ठरेल अशी अपेक्षा आहे.

## निवडक

### मुंबई हायकोर्टाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी महेश चंद्र त्रिपाठी

**मुंबई :** अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांनी बुधवारी (दि. ९) मुंबई हायकोर्टाच्या मुख्य न्यायमूर्तीपदाची शपथ घेतली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी लोकभवन येथे न्या. त्रिपाठी यांना पदाची शपथ दिली. यानंतर राज्यपालांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपसभापती सचिन अहिर, मंत्री छगन भुजबळ, मंगल प्रभात लोढा आदी उपस्थित होते.

### राज्यात पावसाची १६ टक्के तूट

**पुणे :** यंदा राज्यात पावसाची तब्बल १६ टक्के तूट झाली आहे. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाने पाठ फिरवल्याचे चित्र आहे. या भागांमध्ये शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# गणेशोत्सवात उत्तम सेवा देण्यावर भर द्या

### महापौर नितीन पाटील यांचे आढावा बैठकीत निर्देश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येत्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या वतीने विविध विभागांच्या समन्वयाने जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी बुधवारी (दि. ९) महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी गणेशोत्सव काळात नागरिकांना उत्तम सेवा आणि सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश प्रशासनाला दिले.

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या या बैठकीस आयुक्त मंगेश चितळे, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती सभापती ‘अ’चे सभापती



रवींद्र भगत, ‘ब’चे सभापती मधू पाटील, ‘ड’चे सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका दर्शना भोईर, परिवहन उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, स्वरूप खारगे, मंगला माळवे, अभिषेक पराडकर, नानासाहेब कामठे, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, शहर अभियंता राजेश कर्डिले, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, पनवेल निरीक्षक कुंभार, वाहतूक पोलीस अधिकारी उपस्थित होते. यावेळी संबधित विभागाच्या उपायुक्तांनी गणेशोत्सवासाठी केलेल्या तयारीची माहिती दिली.

या बैठकीत बांधकाम विभागास गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मार्गावरील खड्डे, अडथळे व धोकादायक ठिकाणांची तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. प्रमुख विसर्जन मार्गांची स्वच्छता व रस्ते दुरुस्ती करण्याबरोबरच वडाळे तलाव, वडघर तलाव यासह आवश्यक ठिकाणी क्रेन, तराफे व हायड्रा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. आवश्यक ठिकाणी तराफ्यांची संख्या वाढविण्याच्या सूचना बांधकाम विभागास महापौरांनी दिल्या तसेच विसर्जन घाटांवर मंडप, बॅरिकेड्स, टेबल, खुर्च्या, साऊंड सिस्टीम आदी व्यवस्था करून घाटांचे सुशोभीकरण व सुरक्षितता सुनिश्चित करण्यास सांगण्यात आले.

अग्निशमन विभागास गणेशोत्सव काळात तातडीची सेवा उपलब्ध राहण्यासाठी नियोजन करण्याचे तसेच बंदोबस्ताच्या ठिकाणी अग्निशमन कर्मचारी तैनात करण्याचे निर्देश देण्यात आले. विसर्जन स्थळी पोलीस, वाहतूक विभाग, अग्निशमन विभाग व आपत्ती व्यवस्थापन विभागात समन्वय ठेवण्यावरही भर देण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या. **(पान २ वर..)**

# केंद्राकडून सात हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरला मंजुरी

### मुंबईलाही जोडणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशात सात नवीन हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी (दि.९) मंजुरी देण्यात आली. या कॉरिडॉरच्या विकासामुळे देशातील प्रमुख शहरे व परिसरात रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.

कॅबिनेटमध्ये झालेल्या निर्णयांबाबत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकारांना माहिती दिली. ते म्हणाले की, दिल्ली-हावडा (कोलकाता), मुंबई-हावडा (कोलकाता), दिल्ली-मुंबई, दिल्ली-गुवाहाटी, दिल्ली-चेन्नई, हावडा-चेन्नई आणि मुंबई-चेन्नई असे हे ११ हजार किलोमीटर लांबीचे सात हायडेंसिटी कॉरिडॉर आहेत, जे चौपदरी म्हणून विकसित केले जात आहेत आणि इतर अनेक कॉरिडॉरवरही काम सुरू आहे. भविष्यात यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक हाताळली जाईल.

या कॉरिडॉरपैकी अंदाजे दोन हजार किमीचा भाग आधीच चौपदरी झाला आहे. पाच हजार किमीवर काम सुरू असून त्याला मंजुरी मिळाली आहे, तर उर्वरित चार हजार किमीला अंतिम मंजुरी मिळण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार असून प्रवासी वाहतूक आणि मालवाहतूक अधिक सुरळीत, जलद व कार्यक्षम होईल.

# मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकारची कार्यवाही -मंत्री सामंत

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या १५पैकी १२ प्रमुख मागण्या पूर्ण केल्या आहेत. मराठा समाजासाठी मराठवाड्यातील तीन लाख ५९ हजार अर्जांपैकी तीन लाख १६ हजार कुणबी प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. आम्ही १० पावले पुढे आलो आहोत, आता ही कोंडी फोडण्याची जबाबदारी मनोज जरांगे यांची आहे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले. छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीनंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना आरक्षणाचा लढा सुरू झाला आणि एकनाथ शिंदे यांनी एसईबीसी आरक्षण दिले, ते न्यायालयात टिकवण्यासाठी शासन पूर्ण ताकदीने उभे आहे, असे आवाहन आमदार लाड यांनी सांगितले.

मनोज जरांगे यांनी शंका दूर करून आम्हाला बोलावल्यास आम्ही नक्की जाऊ. राहिलेल्या कायदेशीर बाबी मार्गी लावण्यासाठी त्यांनी सरकारला ६० ते ९० दिवसांची मुदत द्यावी, असे मंत्री सामंत म्हणाले. त्याचप्रमाणे मराठा समाजाला हक्काचे आरक्षण देत असताना ओबीसी समाजाच्या आरक्षणावर कोणतीही गदा येणार नाही, ही सरकारची ठाम भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आगामी सण-उत्सव आणि मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता तसेच प्रकृतीची काळजी घेऊन मनोज जरांगे यांनी आपले उपोषण स्थगित करावे, अशी विनंती यावेळी करण्यात आली.

# अश्लील नृत्यप्रकरणी आठ जणींवर गुन्हा

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यात दहीहंडीच्या कार्यक्रमात अश्लील गाण्यावर नृत्य करणाऱ्या नृत्यांगनांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. प्रसिद्ध नृत्यांगना राधा पाटील हिच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर आता आणखी आठ नृत्यांगनांविरोधात सहकारनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

यामध्ये प्रसिद्ध नृत्यांगना निशा मुंबईकर आणि शुभांगी थोरात यांच्यासह आठ जणींचा समावेश आहे. विशेष म्हणजे केवळ नृत्यांगनाच नाही, तर कार्यक्रमाचे आयोजक आणि मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवरही पोलिसांनी कारवाई केली आहे.

# पनवेल भाजपतर्फे पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेलच्या वतीने आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘बाप्पा मोरया’ घरगुती पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांच्या कलागुणांना वाव देण्यासोबतच पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार असून विजेत्यांना एकूण २५ हजार रुपयांपर्यंतची आकर्षक पारितोषिके जिंकण्याची संधी आहे.

गणपती सजावटीसाठी थर्मोकॉलच्या वस्तूंचा वापर करण्यास सक्त मनाई असून पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करणे अनिवार्य आहे. ही स्पर्धा पनवेल शहरातील प्रभाग क्रमांक १४, १८, १९ आणि २०मधील रहिवाशांसाठी खुली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १२ सप्टेंबरपर्यंत नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. नाव नोंदणी करताना स्पर्धकाचे संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक देणे बंधनकारक राहील. स्पर्धेतील परीक्षकांचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहील.

### २५ हजारांपर्यंतची आकर्षक पारितोषिके



स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून अथवा ८७६७१४९२०३ या क्रमांकावर संपर्क साधून नाव नोंदणी करता येईल. गणेशोत्सव हा श्रद्धेसोबतच सामाजिक व पर्यावरणीय जाणीव जपणारा उत्सव ठरावा यासाठी प्रभागातील नागरिकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन पनवेल महापालिकेचे नगरसेवक तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

नोंदणी साठी QR कोड स्कॅन करा!



# ‘ॲपआधारित टॅक्सी चालकांची माहिती तीन महिन्यांत सादर करा’

**मुंबई : प्रतिनिधी**

‘महाराष्ट्र ॲग्रीगेटर धोरण २०२६’ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ॲपआधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांनी त्यांच्या चालकांची संपूर्ण माहिती परिवहन विभागाकडे सादर करावी. चालकांची ओळख, वास्तव्य तसेच आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून पात्र चालकांना ‘धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक कल्याणकारी मंडळा’ चे सदस्यत्व देण्यात येणार आहे. यासाठी चालकांचे डोमिसाइल प्रमाणपत्र तसेच आवश्यक ती सर्व माहिती तीन महिन्यांच्या कालावधीत सादर करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.



‘महाराष्ट्र ॲग्रीगेटर धोरण २०२६’च्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठक मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालनात झाली. या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या सह संबंधित विभागाचे अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे तसेच भारत टॅक्सी, रॅपिडो, उबर, ओला, शालिनी कॅब आणि सिटीफ्लो या ॲपआधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

ॲपआधारित टॅक्सी सेवांमध्ये कार्यरत चालकांना कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. चालक तसेच त्यांच्या कुटुंबीयांना कामगार कायद्यानुसार उपलब्ध असलेल्या विविध सेवा-सुविधांचा लाभ मिळावा, यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले.

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चालकांची ओळख आणि वास्तव्याची खात्री होणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित चालकांचे डोमिसाइल प्रमाणपत्र सादर करणे, व्यवहारिक मराठी भाषा अनिवार्य करण्यात येणार असून, पात्र चालकांना परिवहन विभागाकडून बॅज देण्यात येईल. तसेच त्यांना कल्याणकारी मंडळाचे सदस्यत्व देऊन त्यांच्या कुटुंबीयांनाही मंडळाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यात येणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

ॲग्रीगेटर धोरणानुसार चालकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देतानाच प्रवाशांची सुरक्षितता सर्वोच्च प्राधान्याने विचारात घ्यावी. अपघात तसेच गुन्हेगारीच्या घटना टाळण्यासाठी चालकांच्या अर्जांची आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी काटेकोरपणे करण्यात यावी, अशा सूचनाही मंत्री सरनाईक यांनी दिल्या.

संबंधित ॲपआधारित टॅक्सी कंपन्यांना चालकांची आवश्यक माहिती संकलित करून परिवहन विभागाकडे सादर करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. या कालावधीत चालकांची संपूर्ण माहिती, डोमिसाइल प्रमाणपत्र आणि आवश्यक कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

# मुंबई-गोवा महामार्गावर दोन टेम्पोंची धडक

## क्लीनर ठार, चालक जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

बुधवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास पोलादपूर ग्रामीण रुग्णालयाच्या समोरील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या आयशर टेम्पोला मागील बाजूने अशोक लेलँड आयफाय टेम्पो येऊन जोरदार धडकला. या अपघातात लेलँड चा क्लीनर जागीच ठार झाला तर चालक किरकोळ जखमी झाला.

पोलादपूर येथे मुंबईकडून गोव्याकडे जाणाऱ्या मार्गीकेवर आयशर टेम्पो हा ड्रायव्हर बळीराम बद्रीलाल सोलंकी याने कोणत्याही प्रकारच्या सांकेतिक पार्किंग लाईट न लावता धोकादायक स्थितीत उभा केला होता. यावेळी अशोक लेलँड घेऊन फिर्यादी ड्रायव्हर मल्लिकार्जुन वासुदेव ढवण मुंबईकडून गोव्याकडे चालला असताना आयशर टेम्पोला धडकला. या अपघातात अशोक लेलँड टेम्पोचा ड्रायव्हर मल्लिकार्जुन ढवण हा जखमी झाला तर त्याच्यासोबतचा क्लीनर ताराचंद शिवाजी विहापूरे (वय ४७ वर्षे) हा लेलँड टेम्पोचा दर्शनी भाग आयशर टेम्पोच्या मागील भागावर आढळून पूर्णपणे आत चेपला गेल्याने जागीच ठार झाला.

याप्रकरणी आयशर टेम्पोचा ड्रायव्हर बळीराम सोलंकी याच्या विरुद्ध गुन्हा पोलीस हवालदार टी.टी. सुतार यांनी दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक पवार हे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.

# तळ्यात वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर

**तळा : प्रतिनिधी**

गणेशोत्सव पाच दिवसांवर येऊन ठेपला असून तळा शहरातील रिक्षा स्टॅन्ड ते बळीचा नाका या मुख्य मार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न समोर येत आहे . या मार्गावर नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. गणेशोत्सवाच्या काळात मात्र वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे.

गणेशोत्सव काळात नियमित एस.टी. बससेवेसह जादा बस, खाजगी वाहने, प्रवासी वाहने, रिक्षा, मोटारसायकली, ऍपे रिक्षा व मिनीडोअर यांची मोठी वर्दळ वाढते. गणेशोत्सव काळात दर्शनासाठी शहरात पाहुण्यांची गर्दी होत असल्याने वाहतुकीवर अतिरिक्त ताण येतो.सध्या बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असते. शहरातील हा मुख्य बाजारपेठेचा भाग असल्याने अनेक नागरिक मोटारसायकलीव इतर वाहने दुकानांसमोर उभी करून खरेदीसाठी जातात. त्यामुळे रस्त्याची वाहतूक व्यवस्था विस्कळीत होऊन कोंडी निर्माण होते. परिणामी वाहनचालक तसेच नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. अनेकदा किरकोळ कारणावरून वाहनचालकांमध्ये वादावादी होते, तर काही वेळा हा वाद मोठ्या तंट्याचे रूप घेण्याची शक्यता असते.

वाहतूक कोंडीच्या दृष्टीने दोन वर्षापुर्वी बळीच्या नाक्याच्या पुढे व अवसरे यांचे हॉटेलच्या समोरील आतल्या भागात पार्कींग व्यवस्था आहे.मात्र ती सध्या खुप अपुरी पडत आहे.त्यामुळे दुसरी व्यवस्था करणे आवश्यक आहे.शहरातील वाढती गर्दी आणि वाहतुकीचा विचार करता प्रशासनाने त्वरीत गणेशोत्सवापूर्वीच नियोजन करणे आवश्यक आहे.गणेशोत्सव काळात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने ट्राफीक पोलीस व पोलीस यांची व्यवस्था करावी त्यामधे बसस्थानक,बळीचा नाका,तळेगाव रस्त्याकडे व इंदापुर रस्त्याकडे इत्यादी प्रमुख ठिकाणी अतिरिक्त पोलीस कर्मचारी तैनात करून वाहतूक नियंत्रण करावे,

# गणेशोत्सवसाठी शांतता समितीची बैठक




**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात गणेशोत्सव व इतर सण-उत्सव शांततेत पार पाडले जावेत यासाठी पोलीस ठाण्याच्या माध्यमातून शांतता समितीची सभा घेण्यात आली होती.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. दराडे यांनी गणेश मंडळांना सूचना देत डीजे, लाउडस्पिकर, वाहतूक, मिरवणूक मार्ग तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणेबाबत मार्गदर्शन करून येणारा गणेशोत्सव शांततेत पाडण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याविषयी सूचित केले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये व घडत असेल तर पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या बैठकीस पोलीस पाटील, व्यापारी वर्ग, गणेश मंडळांचे प्रतिनिधी, सर्वपक्षीय राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेरळमध्ये विमल गुटखा विक्रेत्यावर कारवाई

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रतिबंधित सुगंधित मिश्रित तंबाखू, गुटखा व पानमसाल्याची विक्री करणाऱ्यावर रायगड स्थानिक गुन्हे शाखा आणि नेरळ पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. काल सकाळी करण्यात आलेल्या या कारवाईत कृष्णा राधेश्याम गुप्ता (वय ३३) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याच्या राहत्या घरातून २४ हजार २१४ रुपयांचा प्रतिबंधित मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मंगळवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास एलसीबी रायगड आणि नेरळ पोलीस ठाण्याच्या पथकाने गुप्ता याच्या राहत्या घरावर छापा टाकला. घराची झडती घेतली असता तेथे विमल गुटखा, सुगंधित मिश्रित तंबाखू आणि पानमसाला असा प्रतिबंधित साठा आढळून आला. कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची माहिती पोलिसांनी अन्न व औषध प्रशासनाला दिली. त्यानंतर एफडीएचे पथक घटनास्थळी दाखल झाले. एफडीएच्या अधिकाऱ्यांनी जप्त करण्यात आलेल्या गुटखा, सुगंधित मिश्रित तंबाखू व पानमसाल्याचा पंचनामा केला.

या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत महादेव शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून नेरळ पोलीस ठाण्यात संबंधित कायदेशीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**पनवेल महानगरपालिका**

तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड ४१०२०६

**शहर अभियंता विभाग**

जा.क्र. पमपा/बांधकाम/६५२५/ प्र.क्र.१८७/३०५७/२०२६ दिनांक : ०९/०९/२०२६

**ई-निविदा सूचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government/ State Government/Government Undertaking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/02//2025-26 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोलीमधील हनुमान मंदिरापासून ते के.एल.ई. कॉलेज, सेक्टर ०१ पर्यंत व सेंट जोसेफ स्कूल, सेक्टर ०५ पर्यंत पावसाळी गटारांचे बांधकाम करणे. | २,४४,७४,२५२/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ११/०९/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**


# परळी येथील हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू , गुन्हा दाखल

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या सुधागड तालुक्यातील परळी येथील कुंभारआळी येथे राहणारे कुणाल विठ्ठल पवार (वय ४२) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. याप्रकरणी येथील जानकी हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्याचा गुन्हा सोमवारी (दि. ७) पाली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की २० मार्च २०२६ रोजी संध्याकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास कुणाल पवार यांच्या हाताला मुंग्या येत असल्याने आणि उच्च रक्तदाबाचा त्रास जाणवत असल्याने त्यांच्या पत्नी शारदा पवार यांनी त्यांना उपचारासाठी परळी येथील जानकी हॉस्पिटलमध्ये नेले होते.

हॉस्पिटलमधील डॉक्टर विशाल परदेशी यांनी रुग्णाचा रक्तदाब २५० पर्यंत वाढल्याचे सांगितले. त्यानंतर नर्सने त्यांना सलाईन लावून दोन इंजेक्शन्स दिली. रात्री ९:३० वाजण्याच्या सुमारास बिल भरून डिस्चार्ज घेताना कुणाल पवार यांना अचानक चक्कर आली आणि ते खाली पडले. त्यांना तात्काळ वॉर्डमध्ये नेऊन सीपीआर देण्यात आला, परंतु त्यांचा मृत्यू झाला.

सदर घटनेनंतर मयत रुग्णाच्या पत्नीने डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे पतीचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करत पुरवणी जबाब दिला होता. रुग्णाला हृदयविकाराचा झटका आल्याची लक्षणे असतानाही, डॉक्टर विशाल परदेशी यांनी योग्य त्या तपासण्या न करता किंवा तज्ज्ञ डॉक्टरांकडे पाठवण्याऐवजी रुग्णाला तीन तास हॉस्पिटलमध्येच ठेवले. तसेच डिस्चार्ज देताना बीपी तपासणी न करता हलगर्जीपणा दाखवला, असा आरोप तक्रारदारांनी केला होता.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पाली पोलिसांनी उपचाराची कागदपत्रे आणि डॉक्टरांच्या शैक्षणिक अर्हतेची माहितीअलिबाग येथील जिल्हा शल्यचिकित्सकांकडे अभिप्रायासाठी पाठवली होती.शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीची बैठक १८ ऑगस्ट २०२६ रोजी पार पडली. या बैठकीत सर्व वैद्यकीय कागदपत्रांची सखोल पडताळणी करण्यात आली. या पडताळणीनंतर, मयत कुणाल पवार यांच्या उपचारादरम्यान उपचार करणाऱ्या डॉक्टरांचा हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे, असा अधिकृत अभिप्राय तज्ज्ञ समिती आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी २ सप्टेंबर २०२६ रोजी दिला.

जिल्हा शल्यचिकित्सकांच्या अहवालानंतर, शारदा कुणाल पवार यांच्या फिर्यादीवरून ७ सप्टेंबर २०२६ रोजी पाली पोलीस ठाण्यात डॉक्टर विशाल परदेशी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ च्या कलम १०६(१) अन्वये निष्काळजीपणामुळे मृत्यू घडवून आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरुन

## गणेशोत्सवात उत्तम सेवा देण्यावर भर द्या

वाहतूक पोलिसांनी बाजारपेठांमध्ये नागरिकांची गर्दी वाढल्याने वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी उपाययोजना कराव्यात तसेच गणेशोत्सव व गणेश विसर्जनाच्या काळात आवश्यकतेनुसार वाहतूक पोलिसांची संख्या वाढविणे, विसर्जन घाटांवर सुरक्षा रक्षक नियुक्त करून वाहतूक विभाग व पोलिसांना प्रत्येकी सुरक्षा रक्षक उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा यावेळी करण्यात आली.

आरोग्य विभागामार्फत विसर्जन घाटांची स्वच्छता, कचरा व निर्माल्य संकलनासाठी व नैवद्यासाठी वेगळे कलश ठेवणे, गणेशोत्सव मंडळातील निर्माल्य गोळा करण्यासाठी निमाल्य रथ, पुरेसे मनुष्यबळ व वाहने उपलब्ध ठेवण्यात येणार आहेत. विसर्जन घाटांवर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या तसेच विद्युत विभागाला गणेशोत्सवाच्या अनुषंगाने प्रमुख विसर्जन मार्ग व घाटांवरील विद्युत व्यवस्था पूर्ववत व सुरक्षित ठेवण्यास सांगण्यात आले आहे. आवश्यक ठिकाणी जनरेटर व्यवस्था करण्याबरोबरच मिरवणूक मार्गातील धोकादायक किंवा अडथळा ठरणाऱ्या वायर्स हटविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

याचबरोबर वृक्ष प्राधिकरण विभागास गणेशमूर्ती मिरवणूक मार्गातील वाढलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पाणीपुरवठा विभागाकडून गणेशोत्सव काळात महापालिका हद्दीतील सर्व भागांत पाणीपुरवठा नियमित राहील याची दक्षता घेण्याच्या सूचना महापौरांनी केल्या.

याशिवाय प्रत्येक मोठ्या मंडळासाठी साफसफाईसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करणे, विसर्जन घाटांवर सीसीटीव्ही कॅमेरे अद्ययावत ठेवणे व नियंत्रण कक्षाची स्थापना करणे तसेच घाटांवर आवश्यक अग्निशमन वाहने व साधनसामग्री उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा नागरिकांना त्रास होऊ नये, त्यांना विसर्जन घाटांवर सर्व सेवा योग्य पध्दतीने मिळाव्यात यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने योग्य तयारी करण्याचे निर्देश महापौरांनी बैठकीत दिले.

गणोशोत्सवाच्या नियोजनासाठी मुख्यालय स्तरावर तसेच प्रभाग स्तरावर नियोजन समित्या करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या. बैठकीचे प्रास्ताविक परिवहन कैलास गावडे यांनी केले, तर उपायुक्त अभिषेक पराडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.


जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७ / म.प्र -१, दि. १८/१०/२०२३

परिशिष्ट - ३

(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड ई-मेल :- eerid२४@gmail.com दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७

**ई-निविदा सूचना क्र. ६० सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई - निविदा सूचना व ई- निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु. | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | रोहा शाखा कालवा (अष्टमी) सा.क्र. १६/८३० मी मौजे उडदवणे येथील माती भरावाची दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे | ४८,४७,२५६/- (विमा व जीएसटी धरुन) | ४९,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | सुशिक्षित बेरोजगार अभियंता, रायगड जिल्हा |
| २. | माणगाव शाखा कालव्याच्या @ ch.१२/८०० मीटर ते ch१३/५७० मीटर पर्यंत खोल कापलेल्या मागासाठी स्वच्छता आणि उतार उपचार, ता.-माणगाव, जिल्हा-रायगड. | ४८,९५,८४४/ (विमा व जीएसटी धरुन) | ४९,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | सुशिक्षित बेरोजगार अभियंता, रायगड जिल्हा |
| ३. | रोहा शाखा कालवा सा.क्र.१/०२० मी. येथील सुपरपॅसेजचे पुनर्बांधणी तसेच सुरक्षिततेकरीता गॅबीयन वॉल व (संरक्षण) भिंत बांधणे | २४,९८,३८४/- (विमा व जीएसटी धरुन) | २५,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | सुशिक्षित बेरोजगार अभियंता, रायगड जिल्हा |
| ४. | मोरबा शाखा कालव्याच्या, तालुका-माणगाव, जिल्हा-रायगड येथील @ch.१०/२५० मी ते ch.११/०७२ मी पर्यंतच्या खोल खोदलेल्या भागाची स्वच्छता आणि उताराची देखभाल. | २४,९९,५३४/- (विमा व जीएसटी धरुन) | २५,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | सुशिक्षित बेरोजगार अभियंता, रायगड जिल्हा |

**निविदा उपलब्ध कालावधी - दि. ११/०९/२०२६ ते दि. १८/०९/२०२६**
**निविदा उघडण्याचा दि. २१/०९/२०२६**
**खालील संकेतस्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि.१८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई-मेल eerid२४@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई- निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.
८. ई- निविदे प्रक्रियेमध्ये निविदा भरतांना इंटरनेटमध्ये अथवा सर्व्हर डाऊन अथवा सर्व्हरमध्ये त्रुटी निर्माण झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**टिप :- निविदा भरतांना आपले दर G.S. T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

**सही/-**
**( इंजि. राकेश धाकतोडे)**
**कार्यकारी अभियंता,**
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.

आरओसी-२०२६-२७/क्र.-५/सी २७५५

## पनवेल महापालिकेची विशेष सर्वसाधारण महासभा

# विविध विषयांना चर्चेअंती मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण महासभा आज दिनांक ०९ सप्टेंबर रोजी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ही महासभा घेण्यात आली. या महासभेत विविध विषयांवर चर्चा करून विषय मंजूर करण्यात आले.



पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल येथील साई बाबा मंदिर ते हॉटेल आर्या (स्टेशन रोड) व संत सावतामाळी हॉल ते मुख्य कॉँक्रीटी रस्त्याच्या दोन्ही बाजुस जुने पावसाळी गटार तोडून नव्याने पावसाळी गटार व फुटपाथ बांधण्याचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. १५, सेक्टर ०८, खांदा कॉलनी येथील शिव मंदिर मधील विरंगुळा केंद्राची डागडुजी करण्याचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती–ड, प्रभाग क्र.१८ मधील जे.जे. वुड ते भुयारी मार्ग ते भु.क्र.८ए, सेक्टर–१२, खांदा कॉलनी (सी. के.टी. कॉलेज कॉर्नर) पर्यंत रस्ता कॉँक्रीटीकरण करण्याचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती "क" प्रभाग क्र. १४ मधील भुखंड क्र.०४, सेक्टर–१६, नविन पनवेल (प.) या भूखंडावर पनवेल महानगरपालिकेचे "स्वराज्य' मुख्यालय इमारतीचे बांधकाम काम करणे याचा टप्पा १ सुधारित व टप्पा २सुधारित या विषयांचे सादरीकरण करण्यात आले व विषय मंजूर करण्यात आला.

## धान्य वितरणातील अनियमततेबाबत चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल परिसरातील रेशन दुकान क्रमांक १६ आणि १९ मधील दुकानाच्या धान्य वितरणाच्या अनियमिततेबाबत चौकशी करून कारवाई करण्याची मागणी पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका डॉ. अस्मिता जगदीश घरत यांनी पुरवठा अधिकारी पनवेल यांच्याकडे केली आहे. तालुक्यात अनेक लाभार्थ्यांना धान्य दिले जात नाही याकडे तहसील विभाग, पुरवठा विभाग यांनी गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

रेशन दुकान क्रमांक १६ आणि १९ येथील दुकानाच्या वितरणाबाबत नागरिकांकडून वारंवार गंभीर तक्रारी येत आहेत. जुलै महिन्यातील धान्य वितरणासाठी लाभार्थ्यांकडून जुलै महिन्यात ओटीपी घेण्यात आले होते मात्र सदरचे धान्य सात ऑगस्ट रोजी वाटप होईल असे नागरिकांना सांगण्यात आले होते. मात्र त्या दिवशी धान्य वाटप झाले नाही. त्यानंतर तब्बल २९ ऑगस्ट रोजी धान्य वाटप सुरू करून ते जुलै महिन्याचे असल्याचे दुकानदाराकडून सांगण्यात आले.

तसेच नागरिकांकडून ऑगस्ट महिन्याचे देखील ओटीपी घेण्यात आले. मात्र ऑगस्ट महिन्याचे धान्य आलेले नसल्याचे दुकानदाराकडून सांगण्यात आले. याबाबत चौकशी केली असता संबंधित धान्य रेशन दुकानाला यापूर्वीच प्राप्त झाल्याचे माहिती मिळाली. त्यामुळे लाभार्थ्यांकडून ओटीपी घेऊन धान्याचे वितरण वेळेत न करणे तसेच प्राप्त झालेल्या शासकीय धान्याचे वितरणाबाबत विसंगत माहिती देणे हा अत्यंत गंभीर प्रकार असून याची चौकशी करण्याची मागणी नगरसेविका डॉ. अस्मिता घरत यांनी केली आहे.

तसेच निर्धारित केलेल्या प्रमाणात धान्य मिळत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. पाच किलो धान्य मिळणे अपेक्षित असताना काही नागरिकांना दोन ते तीन किलो धान्य दिले जात आहे. दुकानातील प्राप्त साठा, वितरण नोंद व शिल्लक साठ्याची प्रत्यक्ष तपासणी करावी.

## उलवे पुलाजवळ ट्रेलरची कारला धडक; चालकावर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

उलवे ब्रिज सर्कलजवळ भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविलेल्या ट्रेलरने कारला धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात कारचे नुकसान झाले असून, अपघातानंतर ट्रेलरचालक घटनास्थळावरून निघून गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी फॅलेक्स जसीन डिसोझा (वय ३०, व्यवसाय नोकरी, रा. चांजे, उरण) हे आपल्या ताब्यातील मारुती इको कार क्रमांक एमएच ४६ सीव्ही १५०६ मधून प्रवास करीत होते.फिर्यादींच्या कारच्या मागून येणाऱ्या एमएच ४६ बीयू ५३३९ क्रमांकाच्या ट्रेलरच्या चालकाने ट्रेलर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादींच्या कारला उजव्या बाजूने धडक दिली. या धडकेत कारचे नुकसान झाले. त्यानंतर ट्रेलरचालक घटनास्थळावरून निघून गेल्याचे तक्रारीत म्हटले आहे.या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुनील सरगर करीत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रेलरचालकाचा शोध घेण्यात येत आहे.

## महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जमा झालेल्या शैक्षणिक साहित्याचे विद्यार्थ्यांना वितरण

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन जयराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी "बुके नको तर बुक द्या" ही सामाजिक बांधिलकी जपणारी संकल्पना राबविण्यात आली.

यावर्षीही या उपक्रमाला नागरिक, मित्रपरिवार आणि विविध सामाजिक संस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमातून तब्बल ८ हजार वह्या, पेन, पेन्सिल, पट्टी, ड्रॉईंग बुक, पॅड तसेच विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य वाढदिवसाच्या भेटीच्या स्वरूपात जमा झाले.



जमा झालेले हे शैक्षणिक साहित्य खारघर येथील चाफेवाडी व फणसवाडी येथील आदिवासी शाळा, धामोळे गावातील आदिवासी शाळा तसेच वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यालयात सुपूर्द करण्यात आले. हे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि त्यांनी महापौर यांचे आभार मानले.

याशिवाय उर्वरित शालेय साहित्य गरजू विद्यार्थी तसेच इतर आदिवासी शाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

या उपक्रमावेळी माजी नगरसेवक प्रदीप सावंत, सुधीर देसाई, राजा चव्हाण, सचिन नाझरे,नरेंद्र सोनावणे, शाळेचे शिक्षक, पनवेल महानगरपालिकेचे वार्ड अधिकारी जितेंद्र मढवी तसेच जाणीव एक सामाजिक संस्था, अभिनव युवक मित्र मंडळ, अभिनव स्वरागर्जना ढोल–ताशा पथक, नादस्फुर्ती ढोल–ताशा पथक, सामाजिक संस्थां या सर्व संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांचे आभार मानण्यात आले.

> **वाढदिवसाच्या शुभेच्छांमध्ये मिळालेली भेट एका विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी उपयोगी पडावी, त्याच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा आणि त्याच्या भविष्याला ज्ञानाची नवी दिशा मिळावी यापेक्षा मोठी भेट कोणती असू शकते.**
> **–महापौर, नितीन पाटील**

## भरधाव दुचाकीच्या धडकेत १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

कोळखे येथील महिंद्रा शोरूमच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे दुचाकी चालविल्याने झालेल्या अपघातात १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू, तर त्याचा मित्र गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अर्जुन माळगे हा आपल्या मित्रासोबत पनवेल येथे नाश्ता करण्यासाठी जात होता. कोळखे येथील महिंद्रा शोरूमच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर त्यांच्या दुचाकीसमोर स्वराज गायकवाड हा दुचाकी क्रमांक एमएच ४६ सीपी ०५२४ वरून भरधाव वेगाने आला.

रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून दुचाकी चालविल्याने ती घसरली. या अपघातात स्वराज गायकवाड याला पाय, छाती व हाताला गंभीर दुखापत झाली तसेच त्याच्यासोबत असलेल्या जयेश खरात यालाही गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान स्वराज सुभाष गायकवाड याचा मृत्यू झाला, तर जयेश खरात याच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ऑनलाइन गुंतवणुकीचे आमिष समुपदेशकाला ३८ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

ऑनलाइन गुंतवणुकीत मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत खारघर येथील ५१ वर्षीय समुपदेशकाची तब्बल ३८ लाख २२ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. सोशल मीडिया आणि व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून संपर्क साधून पीडितेला ऑनलाइन गुंतवणुकीच्या जाळ्यात ओढण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, खारघर परिसरात राहणाऱ्या या व्यक्तीला सोशल मीडिया तसेच व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून ऑनलाइन 'पाच पैसा कॅपिटल' कंपनीच्या नावाने गुंतवणुकीची माहिती मिळाली. संबंधित लिंकला प्रतिसाद देत गुंतवणुकीची तयारी दर्शवल्यानंतर त्यांना एका व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी करून घेण्यात आले.

यानंतर नफ्याचे आमिष दाखवून त्यांना टप्प्याटप्प्याने विविध खात्यांमध्ये पैसे भरण्यास सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी तब्बल ३८ लाख २२ हजार रुपये गुंतवले. मात्र, त्यानंतर गुंतवलेली मूळ रक्कम किंवा अपेक्षित नफा परत मिळाला नाही.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित व्यक्तीने पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## दारूच्या नशेत कामोठे पोलीस ठाण्यात गोंधळ; धमकी देणाऱ्यावर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

दारूच्या नशेत थेट पोलिस ठाण्यात घुसून गोंधळ घालत पोलिसांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण करणाऱ्या व्यक्तीविरोधात कामोठे पोलिसांनी कारवाई केली आहे. पोलिसांना शिवीगाळ करून धमकी दिल्याप्रकरणी प्रकाश पांडुरंग पवार (वय ३८) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रकाश पवार हा कामोठे सेक्टर ७ परिसरात राहतो. तो दारूच्या नशेत कामोठे पोलिस ठाण्यात आला. त्यानंतर त्याने मोठमोठ्याने आरडाओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग केला.पोलिसांनी त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला असता, त्याने कर्तव्यावर असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांसोबत हुज्जत घालण्यास सुरुवात केली. तसेच पोलिसांना अरेरावीची भाषा वापरून धमकावले. पोलिसांची नोकरी घालविण्याची धमकी देत त्याने शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

या प्रकरणी कामोठे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी प्रकाश पवार याला ताब्यात घेतले असून, त्याच्याविरोधात पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

## पिल्लई कॉलेजमध्ये शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मितीची कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 'माझी वसुंधरा अभियान ७.०' अंतर्गत 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा' हा उपक्रम महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत आज दिनांक ०९ सप्टेंबर रोजी पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स येथे शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची पर्यावरणपूरक कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी विविध ठिकाणी शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मितीच्या कार्यशाळांचे आयोजन पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने करण्यात येत असल्याची माहिती उपायुक्त स्वरूप खारगे यांनी दिली.

या कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व, शाडू मातीच्या गणेशमूर्तींचे पर्यावरणीय फायदे तसेच गणेशोत्सवादरम्यान पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचा अनुभव घेतला. यावेळी उपस्थित पनवेल महानगर पालिकेचे सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे तसेच शाळेचे मुख्याध्यापक डॉ. गजानन वडेर, प्रा. दिपीका शर्मा, पिल्लई विद्यार्थी जीवन, मंदार धुरी, पिल्लई स्कूल ऑफ आर्किटेक्चर आणि डिझाइन डॉ. शबाब रिझवी, संचालक, कम्युनिटी एंगेजमेंट आणि आउटरीच, प्रा.जयेश पाटील, प्रा.अर्चना इंगोले, प्रा.मंगेश उपस्थित होते.

'पुढील पिढ्यांना समृद्ध पर्यावरणीय वारसा देण्याच्या दृष्टीने घरातील मुलांच्या हस्ते गणेशमूर्ती तयार करून तिची प्रतिष्ठापना करावी,' या संकल्पनेतून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा आणि संस्कृतीचा उत्सव असला, तरी त्यासोबत पर्यावरणाची जबाबदारी जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

यावेळी उपस्थितांनी 'माझी वसुंधरा' प्रतिज्ञा घेत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प केला. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांनी पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## पनवेल रेल्वे स्टेशनजवळून दुचाकीची चोरी

**पनवेल :वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानकाजवळ पार्क केलेली सुमारे १५ हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी दिशांत दिनेश तेंडुलकर (३५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी आपली लाल व काळ्या रंगाची हिरो होंडा कंपनीची पॅशन प्लस दुचाकी (क्रमांक MH ०४ DU २९९३) पनवेल रेल्वे स्थानकाजवळील पार्किंगच्या बाहेरील आवारात, इमारतीसमोरील रस्त्यावर उभी केली होती. अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या संमतीशिवाय दुचाकी लबाडीच्या उद्देशाने चोरून नेली. दुचाकीची अंदाजे किंमत १५ हजार रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त सेल्फ गव्हर्नन्स उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी self governance dayमोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका उत्साहाने स्वीकारून अध्यापन वा विद्यालयीन व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

Self governance day साठी सहभागी विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित राहून विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. इतर विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

या Self governance day उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कार्याची, जबाबदाऱ्यांची आणि शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची जाणीव झाली. शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यालयात उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरण निर्माण झाले.

सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमास प्राचार्या डॉ निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.



## लायन्स क्लबतर्फे चिखले आश्रमशाळेत शिक्षकांचा सन्मान

### विद्यार्थ्यांना वह्या, विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप





**पनवेल : वार्ताहर**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ ए ४ अंतर्गत विविध लायन्स क्लबच्या वतीने चिखले येथील आश्रमशाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आश्रमशाळेतील २१ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल प्रवीण सरनाईक, तर विशेष अतिथी म्हणून द्वितीय प्रांतपाल विजय गणात्रा उपस्थित होते. यावेळी प्रवीण सरनाईक यांनी भावी पिढी घडविण्यात शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच लायन्स चळवळीची माहिती देत विद्यार्थ्यांनी भविष्यात सक्षम झाल्यानंतर समाजसेवेची भावना जपावी, असे आवाहन केले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप, तर विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिन्सचे वाटप करण्यात आले. भारतात वाढत असलेल्या कर्करोगाबाबत तसेच बालकांमधील कर्करोगाविषयी लायन्स डिस्ट्रिक्टचे कर्करोग व बालकर्करोग समितीचे अध्यक्ष मुश्ताक खान यांनी विद्यार्थ्यांना जनजागृतीपर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमादरम्यान शाळेतर्फे आयोजित रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन प्रांतपाल प्रवीण सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक विष्णू गायकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले, तर संजय गोडसे यांनी सूत्रसंचालन केले.या कार्यक्रमाचे आयोजन बाल शिक्षण समितीचे राजेशकुमार, जिल्हा सहखजिनदार संजय गोडसे आणि मुश्ताक खान यांनी केले होते. न्यू पनवेल स्टील टाऊन, पनवेल सरगम, उलवे जेम्स, नवी मुंबई प्लॅटिनम, तुर्भे, सीबीडी आणि नेरुळ येथील लायन्स क्लबचा या उपक्रमात सहभाग होता.यावेळी जागृती पाटील, आदित्य दोशी, राजेश जगासिया, स्वाती गोडसे, श्रेया तिवारी, ए.सी.झुल्का, आर. पी. आरपी पांडे उपस्थित होते

## संपादकीय

# आव्हानात्मक परिषद

राजधानी नवी दिल्लीत येत्या १२ आणि १३ तारखेला होणारी अठरावी ब्रिक्स परिषद म्हणजे बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताचे स्थान अधिक भक्कम करण्याची मोठी संधी आहे. 'ग्लोबल साउथ'चे हित जपताना भारताला ब्रिक्सचे व्यासपीठ कोणत्याही एका गटाच्या विरोधाचे साधन न बनवता विकासाभिमुख सहकार्याचे माध्यम बनवायचे आहे.

**ब्रिक्सच्या विस्तारामुळे या संघटनेचे आर्थिक आणि भूराजकीय महत्त्व वाढले आहे. भारत, चीन, रशिया, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेपासून सुरू झालेल्या या समूहात आता इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, इराण, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसारखे देश आहेत. त्यामुळे व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, अन्नसुरक्षा, पुरवठा साखळी, डिजिटल अर्थव्यवस्था, आरोग्य आणि शाश्वत विकास हे विषय केंद्रस्थानी राहणे स्वाभाविक आहे. जागतिक व्यापारातील अस्थिरता, युद्धजन्य परिस्थिती आणि पुरवठा साखळ्यांवरील दबाव लक्षात घेता, अधिक लवचिक आणि परस्परपूरक आर्थिक सहकार्याची गरज पूर्वीपेक्षा तीव्र झाली आहे. ब्रिक्सचे अध्यक्षपद २०२६ मध्ये भारताकडे असून व्यापक दृष्टिकोनातून भारताने परिषदेची पूर्वतयारी केली आहे. संयुक्त राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांमध्ये विकसनशील देशांना अधिक प्रतिनिधित्व मिळावे हा भारताचा महत्त्वाचा आग्रह आहे. विशेषतः डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, नवोन्मेष, एमएसएमई व्यापार, हरित ऊर्जा आणि पायाभूत सुविधा वित्तपुरवठा या क्षेत्रांत ठोस परिणाम साधणे भारतासाठी अधिक महत्त्वाचे ठरेल. मात्र भारतासमोर आव्हानेही कमी नाहीत. विस्तारलेल्या ब्रिक्समध्ये सदस्यांचे आर्थिक हितसंबंध आणि परराष्ट्र धोरणे एकसारखी नाहीत. रशिया–युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, अमेरिका–चीन स्पर्धा आणि भारत–चीन संबंध यांची सावली या परिषदेला जाणवणार आहे. अशा परिस्थितीत सर्व सदस्यांना एकत्र ठेवत भारताने स्वतःची धोरणात्मक स्वायत्तता जपणे ही भारतासाठी मुत्सद्देगिरीची मोठी आव्हानात्मक कसरत ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी ११ तारखेला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट विशेष महत्त्वाची आहे. ऊर्जा, संरक्षण, व्यापार, अणुऊर्जा आणि नव्या तंत्रज्ञानातील सहकार्य हे त्यांच्या संभाव्य चर्चेचे विषय आहेत. रशियाच्या एसयू–५७ या पाचव्या पिढीतील लढाऊ विमानांच्या खरेदीसंदर्भातही चर्चा होण्याची शक्यता आहे असे सांगितले गेले आहे. रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर अमेरिकेने लादलेल्या अतिरिक्त शुल्काचे परिणाम तसेच द्विपक्षीय आर्थिक सहकार्य या मुद्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. भारतासाठी ब्रिक्स परिषदेत सर्वांत महत्त्वाचे आहे ते स्वतःच्या राष्ट्रीय हितांना व्यापक जागतिक अजेंड्याशी जोडणे. स्वस्त आणि सुरक्षित ऊर्जा, विश्वसनीय पुरवठा साखळ्या, भारतीय उद्योगांसाठी नवीन बाजारपेठा, तंत्रज्ञान सहकार्य आणि ग्लोबल साउथमधील नेतृत्व या सर्व आघाड्यांवर भारताला लाभ मिळवायचा आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारसमोरील खरी कसोटी परिषद यशस्वीपणे पार पाडण्याची नसून दिल्लीतील राजनैतिक संवादाला दीर्घकालीन आर्थिक आणि सामरिक परिणामांमध्ये रूपांतरित करण्याची आहे. भारताला ब्रिक्समधून कोणाही विरोधात आघाडी उभी करायची नाही. परंतु अमेरिकेने कठोर निर्बंध लादलेले रशिया आणि इराण पाश्चिमात्य देशांना आव्हान देण्यासाठी ब्रिक्सचा वापर करतील. भारताला मात्र अमेरिका आणि युरोपसोबतच्या आपल्या संबंधांना धक्का न लागू देण्याची खबरदारी घ्यावी लागेल. भारताला स्वतःसाठी आणि विकसनशील जगासाठी अधिक संतुलित, बहुध्रुवीय आणि विकासकेंद्री जागतिक व्यवस्था घडवायची आहे. हीच भारताच्या ब्रिक्स अध्यक्षपदाची दिशा असेल.**

# जीवन पुन्हा नाही; आनंदाने जगण्याची कला शिका!



जीवनाचे मोल केवळ एका गोष्टीवरून समजून घ्या की, एखादे मृत शरीर आहे; जगातील सर्व संपत्ती खर्च करून, अत्याधुनिक रुग्णालये, सरकारे, धार्मिक कर्मकांड या सर्वांनी मिळून प्रयत्न केले, संपूर्ण ब्रह्मांडाची ताकद पणाला लावली, तरी मृत शरीरात एका सेकंदासाठीही प्राण आणता येत नाहीत. म्हणजेच जीवन अनमोल आहे. ते संपविण्याचा अधिकार आपल्याला स्वतःला पण नाही, कारण हे जीवन पालकांची देन आहे. दरवर्षी १० सप्टेंबर रोजी "विश्व आत्महत्या प्रतिबंध दिवस" जगभरात जनजागृतीसाठी साजरा केला जातो. लोकांच्या मनातील आत्महत्येसारखे वाईट विचार दूर करून सुखद आणि सकारात्मक विचारांचे वातावरण निर्माण करण्यावर भर देणे हा त्याचा उद्देश आहे. "आत्महत्येबद्दलचा विचार बदलूया आणि संवादाची सुरुवात करूया" ही त्याची संकल्पना असून २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी हीच संकल्पना ठेवण्यात आली आहे.

आजच्या आधुनिक युगात आत्महत्यांच्या घटनांमध्ये झालेली मोठी वाढ आपल्याला संकेत देत आहे की, आपण अनुचित वातावरणात वावरतोय. आत्महत्येची कारणे जसे की मानसिक आरोग्याच्या समस्या, मानसिक खेळांचे बळी ठरणे, एकटेपणा आणि कमकुवत होत चाललेले सामाजिक संबंध, अपयश, शिक्षण आणि करिअरचा दबाव, आर्थिक असुरक्षितता, फसवणूक, भीती, नातेसंबंध तुटणे, सामाजिक तुलना आणि डिजिटल दबाव, हिंसा, गैरवर्तन आणि भेदभाव, मादक पदार्थांचे सेवन किंवा वाईट व्यसन, खोटे देखावे करण्याची सवय, शरीरात किंवा मनात दीर्घकाळ राहणाऱ्या वेदना आणि आजार. अशा अनेक कारणांमुळे आत्महत्यांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. यात लवकरच सुधारणा करणे आवश्यक आहे.

जेव्हा आत्महत्या होते, तेव्हा केवळ एका व्यक्तीचा जीव जात नाही, तर त्या कुटुंबात, नातेवाईकांमध्ये, कार्यस्थळी, समाजात आणि संबंधित संपूर्ण समुदायामध्ये कायमस्वरूपी एक जागा रिकामी होते तसेच सामाजिक, भावनिक आणि आर्थिक परिणाम होतात. आत्महत्या रोखण्यासाठी परस्पर संबंधांमध्ये सहानुभूतीपूर्वक संवादाला प्रोत्साहन देणे अत्यंत गरजेचे आहे. गैरसमज दूर करणे, समस्या सांगणे, मोकळेपणाने आपले म्हणणे मांडणे, सहानुभूती आणि सहकार्याचे वातावरण निर्माण करणे, या गोष्टी अत्यंत आवश्यक आहेत. सरकार आणि सामाजिक संस्थांनीही समाजात आनंददायक, सकारात्मक वातावरण टिकवून ठेवण्यासाठी अमूल्य भूमिका बजावली पाहिजे.

ज्या देशात किंवा समाजात अधिक समस्या आणि अडचणी असतात, तेथील वातावरणात राहणारे लोक अधिक आत्महत्या आणि गुन्हे करतात, कारण जगण्यासाठी अधिक संघर्षाचा सामना करावा लागतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानसिक आरोग्य ॲटलस २०२४ अहवालानुसार, वर्ष २०२१मध्ये आत्महत्येमुळे ७,२७,००० मृत्यू झाले. तरुणांमध्ये मृत्यूचे तिसरे सर्वात मोठे कारण आत्महत्या हेच आहे. जागतिक स्तराच्या तुलनेत भारतात आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातील शेतकरी वर्गाच्या आत्महत्या हा सर्वाधिक चिंतेचा विषय आहे. महाराष्ट्र सरकारच्या आकडेवारीनुसार, राज्यात वर्ष २०२३मध्ये एकूण ६,६६९ शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केली, तर संपूर्ण भारतात १०,७८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली होती.

अनेक वेळा आपल्याला माहीत असते की, एखादी गोष्ट आपल्यासाठी नुकसानकारक आहे, तरीही आपण सुधारत नाही. पुष्कळदा छोट्या–छोट्या निरुपयोगी गोष्टींना अधिक महत्त्व दिले जाते, ज्याचा थेट वाईट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. आजकाल स्वतःला दुःख देण्यासाठी आपण स्वतःच अधिक जबाबदार आहोत. लवकर राग येणे, मनासारखे काम न झाल्यास आपला संयम गमावणे, इतरांना दोष देणे किंवा द्वेष करणे, इतरांवर आंधळा विश्वास ठेवणे, भावनांच्या भरात वाहून जाणे, स्वार्थ, लोभ, खोटा देखावा करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही तो देखावा कायम ठेवणे, समाधानाचा अभाव, सतत जीवनाच्या स्पर्धेत धावत राहणे, वाईट संगत, इतरांच्या आनंदात दुःखी होणे आणि दुःखात आनंदी होणे, मत्सर, लोकांकडून जास्त अपेक्षा ठेवणे, परावलंबी असणे, मानसिक खेळांचे बळी ठरणे, मेहनतीपासून दूर पळणे आणि शॉर्टकटचा अवलंब करणे अशा अनेक गोष्टी माणसाने स्वतःच निर्माण केलेल्या आहेत. माणूस इच्छित असल्यास या गोष्टींवर नियंत्रण ठेवून अधिक चांगले, आरोग्यदायी आणि समाधानी जीवन जगता येऊ शकते. आपल्या चुकांचे परिणामच अनेकदा आपल्याला आत्महत्येच्या विचारांपर्यंत घेऊन जातात. त्यामुळे असे काम किंवा वर्तन करावे, ज्यामुळे आपण अडचणी आणि चुकांपासून दूर राहू शकू.

इतरांवर लगेच विश्वास ठेवू नका, कोणावरही आंधळा विश्वास ठेवू नका. परिस्थितीनुसार आपल्या कामात परिवर्तनशीलता आणा, कौशल्ये शिका. गडद मनोवैज्ञानिक खेळ खेळणाऱ्या लोकांपासून दूर राहा. खोट्या देखाव्यापासून दूर राहा, व्यसनांपासून दूर राहा, वाईट संगत करू नका. पश्चात्ताप करण्यात वेळ वाया घालवू नका; आता काय चांगले करता येईल याचा विचार करा. चांगल्या लोकांच्या संपर्कात राहा, जे प्रतिकूल परिस्थितीतही तुमची साथ देतील. आधुनिकता आणि सोशल मीडियाचे व्यसन लागू देऊ नका. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी विचार करा, परिणामांचा अंदाज घ्या आणि त्यानंतर कृती करा. तीव्र राग, भावना किंवा जोशाच्या भरात अनुचित निर्णय घेण्यापासून दूर राहा. आधुनिक जीवनशैली मानवी जीवनासाठी शाप ठरत आहे, तिचे अंधानुकरण करू नका. समाधानी राहा, मेहनतीवर विश्वास ठेवा, आपल्या इच्छा इतरांवर लादू नका, दररोज स्वतःसाठी वेळ काढा, आरोग्यदायी छंदांना प्राधान्य द्या.

शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या तंदुरुस्तीसाठी दररोज व्यायाम करा. निसर्ग, पर्यावरण, पशू–पक्ष्यांचे संरक्षण आणि परोपकाराची भावना जागृत करा, असहाय्यांना मदत करा. आयुष्य नवचैतन्याने जगायचे आहे, केवळ वेळ घालवायचा नाही आहे. चारित्र्य जपा, आपल्या माणसांच्या प्रेमाची, भावनांची कदर करा आणि आपल्या अनमोल जीवनाचे मोल समजून घ्या. आपल्या कृतीमुळे कधीही कोणाला त्रास होऊ नये, अशा जीवनाचा निर्धार करा. जर आपण अनुचित काम करत नसू, तर लोक काय म्हणतील याचा विचार करू नका. कोणतेही काम छोटे–मोठे नसते. इतरांच्या आनंदात आनंदी होणे आणि इतरांच्या दुःखात त्यांच्या वेदना वाटून घेणे हीच माणुसकी आहे, हेच मानवाचे कर्तव्य आहे. अशा सवयी आणि वातावरणात जगणारी व्यक्ती नेहमी सकारात्मक ऊर्जेने ओतप्रोत असते, ती त्रास आणि अडचणींपासून पळून जात नाही, तर त्यांचा ठामपणे सामना करते. ती नेहमी शांत, सजग, समाधानी आणि प्रसन्न राहते आणि आपल्यालाही असेच जगायचे आहे.

लुई ब्रेल, अब्राहम लिंकन, फ्लोरेन्स नाइटिंगेल, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, थॉमस एडिसन, अलेक्झांडर ग्रॅहम बेल, मेरी क्युरी, डॉ. बी.आर. आंबेडकर, श्रीनिवास रामानुजन, चार्ली चॅप्लिन, नेल्सन मंडेला, मदर तेरेसा, ए.पी.जे. अब्दुल कलाम, दशरथ मांझी, बचेंद्री पाल, सिंधुताई सपकाळ, अरुणिमा सिन्हा, मलाला युसुफझाई, निक वुजिसिक, तुळशी गौडा, सोनम वांगचुक, मेरी कोम यांसारखे असंख्य लोक होऊन गेले आणि आजही आहेत, ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून संघर्षमय जीवनाला एक आदर्श बनविले आणि जगात मार्गदर्शक म्हणून प्रकाशमान झाले.

तणावामुळे हृदयविकाराचा झटका, पक्षाघात किंवा इतर गंभीर आजारांच्या समस्या वेगाने वाढत आहेत. कोणत्याही समस्येचा ताण घेऊ नका. तणाव व्यवस्थापनाची कला आपण आपल्या देशातील नेत्यांकडून शिकली पाहिजे. अतिसामान्य ग्रामीण व्यक्ती, साधारण कद–काठीचा, जवळजवळ अशिक्षित गरीब मजूर दशरथ मांझी यांनी कोणाच्याही मदतीशिवाय २२ वर्षांच्या अथक परिश्रमातून एकट्याने डोंगर कापून लोकांच्या सोयीसाठी रस्ता तयार केला. एवढ्या अडचणींमध्ये त्यांनी इतिहास घडविला, तर आपण आयुष्यात एवढ्या लवकर का हार स्वीकारायची? यश मिळेपर्यंत प्रयत्न सुरू ठेवा. आपल्या कामात छोटीशी मुंगीही कधी हार मानत नाही; मग आपण तर माणूस आहोत. आपला निर्धार आणि धैर्य बुलंद असेल तर आपणही नक्कीच जिंकू. अडचणी, अपयश किंवा दुःख आले, किंवा कधीही वाईट विचार त्रास देऊ लागले, तर एक गोष्ट लक्षात ठेवा की, जगात आपल्यापेक्षाही अधिक वाईट परिस्थितीत लोक जगत आहेत आणि वेळ थांबत नाही. काळ बदलतोच; आपलाही काळ बदलेल नक्कीच.

**–डॉ. प्रितम गेडाम**

## बदलते तंत्रज्ञान

### रेट्रो लूकमधील फोटो बनवायचाय; 'हे' सोपे प्रॉम्प्ट्स

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर सध्या १९८०च्या दशकातील 'रेट्रो'फोटोंचा नवा व्हिज्युअल ट्रेंड प्रचंड व्हायरल होत आहे.




फक्त साधा फिल्टर वापरण्याऐवजी, युजर्स आपले फोटो एआय टूल चॅटजीपीटीमध्ये अपलोड करून ८०च्या दशकातील क्लासिक ॲनालॉग कॅमेरा लूक तयार करत आहेत.

इन्स्टाग्राम स्टोरीजवर 'Add Yours' स्टिकरच्या माध्यमातून युजर्स हे फोटो आणि प्रॉम्प्ट्स एकमेकांसोबत शेअर करत आहेत. "जर ४० वर्षांपूर्वी माझा फोटो काढला असता, तर मी कसा दिसलो असतो?" या कल्पनेतून हा ट्रेंड वेगाने लोकप्रिय होत आहे.

फोटोमध्ये काय आहे खास?


या एआय–जनरेटेड फोटोंमध्ये ८०च्या दशकातील वॉर्म लायटिंग, सॉफ्ट फोकस, फिल्म ग्रेन आणि जुन्या कॅमेऱ्याची टेक्सचर पाहायला मिळत आहे. या फोटोंमध्ये भारतीय फॅशनचा सुंदर मेळ दिसतो. महिलांसाठी रंगीबेरंगी साड्या, ८०च्या दशकातील हेअरस्टाइल आणि पारंपरिक दागिने; तर पुरुषांसाठी त्या काळातील शर्ट्स, हाय–वेस्ट ट्राउझर्स, मिशा आणि क्लासिक हेअरकट अशा शैलीत फोटो तयार होत आहेत. यामध्ये ८०च्या दशकातील बॉलीवूड हिरो–हिरॉईन लूक, जुने कौटुंबिक अल्बम (Family Album), दूरदर्शनचा काळ, जुन्या मॅगझिनचे कव्हर आणि १९८० च्या दशकातील लग्नाचे फोटो अशा विविध थीम्स युजर्स वापरत आहेत.

चॅटजीपीटीच्या मदतीने फोटो कसा बनवायचा?

* चॅटजीपीटी उघडा आणि तुमचा एक स्पष्ट फोटो अपलोड करा.
* फोटोसोबत १९८०च्या दशकातील कपडे, हेअरस्टाइल, बॅकग्राउंड आणि ॲनालॉग कॅमेरा इफेक्ट हवा असल्याचे सांगणारा स्पष्ट मेसेज टाइप करा.
* एआयने फोटो तयार केल्यानंतर तो डाऊनलोड करून इन्स्टाग्राम स्टोरीवर 'Add Yours' स्टिकर वापरून पोस्ट करा.

विशेषतः भारतीय संदर्भात हा ट्रेंड खूप पसंत केला जात आहे. हा फोटो एखाद्या डिजिटल ॲपने तयार केलेला न वाटता खरोखरच जुन्या कॅमेऱ्याने टिपल्यासारखा दिसतो.

# 'ती फुलराणी' फेम अभिनेत्री भक्ती बर्वे



### निमित्त

फुलराणी'चे १९१९हून अधिक प्रयोग करणाऱ्या अभिनेत्री कै. भक्ती बर्वे–इनामदार यांचा आज जन्मदिवस. त्यांचा जन्म सांगली येथे १० सप्टेंबर १९४८ रोजी झाला. त्यांच्या शालेय जीवनात सुधा करमरकर यांच्या 'लिटल थिएटर'मध्ये नाटकातून काम करून त्यांनी रंगभूमीवर पाऊल ठेवले. आकाशवाणीवर आणि दूरदर्शनवर त्यांनी निवेदिका म्हणूनही काम केले.

अशोक हांडे यांच्या 'माणिकमोती' या कार्यक्रमाचे निवेदन भक्ती बर्वे–इनामदार यांनी केले. दूरदर्शनवर त्यांनी बहिणीबाई चौधरी यांची भूमिकादेखील केली. दूरदर्शनवरील साप्ताहिकी तसेच वृत्तनिवेदिका म्हणूनही काम केले. त्यांनी अनेक गुजराती नाटकातूनही अभिनय केला.

कुंदन शाह यांनी दिग्दर्शित केलेल्या 'जाने भी दो यारों या विनोदी हिंदी फिल्ममधे भक्ती बर्वे–इनामदार यांनी नसिरुद्दीन शहा पंकज कपूर, सतीश शहा यांचे बरोबर काम केले. त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर नेले ते फुलराणीने पु.ल. देशपांडे यांनी जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या 'पिग्मॅलियन' या नाटकाचे केलेले मराठी रूपांतरण म्हणजे 'ती फुलराणी'.


'पुलं'ना हे नाटक मराठीत छान होईल असे वाटले. भाषेच्या उच्चारपद्धतीवरुन ठरणाऱ्या उच्च–नीचत्वाच्या कल्पना जगभरात रूढ आहेत हे त्यांना नाटकाच्या रूपातून दाखवायचे होते व त्यांच्या कल्पनेला भक्ती बर्वे–इनामदार यांनी आपल्या अभिनयातून न्याय दिला. अशोक पाटोळे यांनी लिहिलेल्या 'आई रिटायर होतेय नाटकाची निर्मिती त्यांना डोळ्यांसमोर ठेवूनच करण्यात आली होती. या नाटकाचे त्यांनी ७५० प्रयोग केले. या नाटकाचा पहिला प्रयोग १७ ऑगस्ट १९८९ रोजी मुंबईच्या शिवाजी मंदिर येथे झाला होता. त्यांच्या निधनानंतर त्यांच्याऐवजी स्मिता जयकर त्या नाटकात काम करू लागल्या. त्यांनी १९७३पासून एकूण १०० कलाकृती दिग्दर्शित केल्या आहेत. त्यात ७० हौशी आणि व्यावसायिक नाटके, १७ मराठी चित्रपट, तीन टेलिफिल्म्स आणि १० मराठी–हिंदी मालिका यांचा समावेश आहे.

भक्ती बर्वे–इनामदार यांना त्यांची भूमिका असलेले नाटक 'रातराणी' खूप आवडायचे. 'रातराणी' हे प्रभाकर लक्ष्मण मयेकरांचे नाटक भद्रकाली या संस्थेने २२ जानेवारी १९८७ रोजी मंचावर आणले. या नाटकात पियानोवादक ॲसना स्मिथच्या भूमिकेत भक्ती बर्वे, तर व्हायोलिनवादक तिचा नवरा म्हणून अरुण नलावडे यांच्या भूमिका होत्या. हेच नाटक म्हणून रेशीमगाठ हिंदीत आणले व त्याच्यातही त्यांनी अभिनय केला केली तसेच या नाटकाचाच मराठीत 'रेशीमगाठ' म्हणून चित्रपट करायचे ठरविले, पण तो पूर्ण झाला नाही २००२मध्ये पूनम टेलिफिल्मतर्फे मराठी रेशीमगाठ आणि हिंदीत 'तुम्हारा इंतजार है' चित्रपट आले, ज्यामध्ये अना स्मिथचे काम रीमा लागू यांनी केले. ॲना स्मिथ'ला त्या वर्षीची नाट्यदर्पण, नाट्य परिषद, व्यावसायिक राज्य नाटय स्पर्धेत पारितोषिके मिळाली, तर महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात ॲलना स्मिथ सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ठरली.

मराठी नाट्यक्षेत्रातल्या कामगिरीसाठी भक्ती बर्वे–इनामदार यांना १९९० साली संगीत नाटक अकादमी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. हिंदी चित्रपटांतील आघाडीचे सहअभिनेते शफी इनामदार यांच्याशी त्यांचा विवाह झाला. १२ फेब्रुवारी २००१ रोजी त्या वाई येथील कृष्णाबाई उत्सवास उपस्थित राहून रात्रीच मुंबईला परत गेल्या त्या कायमच्याच. वाटेतच त्यांच्या आयुष्यावर कायमचा पडदा पडला. ती काळरात्रच ठरली.

**–माधव विद्वांस**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### जेवल्यानंतर आंघोळ करणं योग्य की अयोग्य?

दिवसभराच्या थकव्यानंतर शांत झोप लागावी यासाठी बरेच लोक रात्रीच्या जेवणानंतर आंघोळ करतात पण तुम्ही अनेकदा पाहिलं असेल की जेवल्यानंतर लगेच आंघोळ करणं चुकीचं ठरतं. बऱ्याच लोकांना रात्रीचं जेवण झाल्यावर आंघोळ करण्याची सवय असते. पण खाल्ल्यानंतर आंघोळ केल्यानंतर पोटदुखी, पोटात वेदना, अपचनासारख्या समस्या उद्भवू शकतात.



यावर आतापर्यंत कोणताही वैज्ञानिक रिसर्च करण्यात आलेला नाही. आंघोळीनंतर गरम पाण्यानं आंघोळ करणं प्रत्येक व्यक्तीसाठी नुकसानकारक ठरू शकतं असं नाही. तरीसुद्धा खाल्ल्यानंतर शरीरात होणाऱ्या बदलांना समजून घेणं महत्वाचं ठरतं.

हेल्थलाईनच्या रिपोर्टनुसार जेव्हा तुम्ही अन्न खाता तेव्हा शरीर अन्न पचवण्याची क्रिया सुरू करते. यामुळ पचन तंत्र ब्लड फ्लो वाढवतो. ज्यामुळे पोटभर खाल्ल्यानंतरही शरीर हलकं गरम राहतं. जेव्हा तुम्ही गरम पाण्यानं किंवा थंड आंघोळ करता तेव्हा शरीराचं तापमान थोडं वाढू शकतं. गरम पाणी शरीरातील प्रक्रिया सक्रिय करते. ज्याला हायपरथर्मीक एक्शन असं म्हटलं जातं. यामुळे शरीराच्या आतील तापमान वाढू शकतं. शरीरात ब्लड फ्लो आणि तापमानाशी संबंधित बदल अन्न पचण्यास अडथळा आणतात.

गरम पाण्यानं आंघोळ केल्यानं काय समस्या उद्भवतात?

गरम पाण्यानं आंघोळ केल्यानं शरीराला आराम मिळतो पण यामुळे हार्ट रेट वाढू शकतो. जर पोटभर जेवला असाल आणि त्यानंतर आंघोळ केली तर शरीरात बरेच बदल जाणवू शकतात. खासकरून जास्त फॅट, प्रोटीन, फायबरयुक्त पदार्थ खाल्यानंतर पोट फुगणं, पोट जड वाटणं अशा समस्या उद्भवतात. तुम्ही किती प्रमाणात खाता, काय खाता हे लक्षात घेणंही महत्वाचं ठरतं.

जेवणानंतर आंघोळ करायचीच असेल तर ही काळजी घ्या

तुम्हाला जेवणानंतर लगेच आंघोळ करायचीच असेल तर गरम पाण्याऐवजी कोमट किंवा थंड पाण्याचा वापर करा. थंड पाणी शरीराचा आतील तापमान वाढवते. गरम पाण्याच्या तुलनेत कोमट पाण्याचा शरीरावर कमी प्रमाणात होतो. जर तुम्ही जास्त जेवला असाल तर काहीवेळ वाट पाहणं चांगला पर्याय आहे. जवळपास २० मिनिटं वाट पाहिल्यानंतर आंघोळ करावी.

# नमुना – १

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी महाड यांचे कार्यालय
ता. महाड, जि. रायगड
दिनांक. ०७/०९/२०२६

**क्रमांक :– भूसंपादन/कात–५/ वाघोली (मळई)/ नोटीस/२०२६**

ज्याअर्थी, जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड अलिबाग यांनी मौजे वाघोली (मळई) लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत मौजे वाघोली या गावांतील धरण, सांडवा, टेल चॅनलसाठी खाजगी जमिनी, लघुपाटबंधारे योजना वाघोली ता. महाड, जि. रायगड या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासननिर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण–०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ–२, दिनांक १२ मे २०१५ मधील तरतुदीस अनुसरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने महसूल विभागातर्फे संपादन करणे संबंधी जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, जि. रायगड यांजकडे पत्र नं. जा.क्र मृद व. ज.सं.वि/रा/प्रशा/१९३९/सन २०२४, दिनांक १५/१०/२०२४ अन्वये प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांचे आदेश क्रमांक भूसंपादन / टे–६/३१२६१५३/मौजे वाघोली (मळई) / २०२४ दिनांक २२/१०/२०२४ अन्वये उक्त शासन निर्णय दिनांक १२ मे २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यूएन ०१/२०१७/ प्र.क्र. १२/अ–२, दिनांक २५ जानेवारी २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी पोपट ओमासे, उपविभागीय अधिकारी महाड याद्वारे,

१. अनुसूची एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पद्धतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड अलिबाग यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

२. प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

३. संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीद्वारे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड अलिबाग यांचे नावे खरेदी देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः व अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

४. संबंधित भूधारकांची ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड – अलिबाग यांचेकडे दाखल करावीत.

५. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड अलिबाग यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तसेच सदर नमुना महामंडळाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यामार्फत भूधारकांना उपलब्ध करून देण्यात येईल.

६. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपविभागीय अधिकारी महाड व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड अलिबाग, यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसूची – १**

**मौजे वाघोली (मळई), ता. महाड, जि. रायगड**

| अ.क्र | स. नं/हि न | एकूण क्षेत्र हे.आर | खरेदी करावयाचे संपादनाचे क्षेत्र हे.आर |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 61/1 पैकी | 0.1000 | 0.0050 |
| 2 | 62/1 पैकी | 0.5390 | 0.0150 |
| 3 | 62/2 पैकी | 0.4800 | 0.0430 |
| 4 | 62/8 पैकी | 0.0760 | 0.0440 |
| 5 | 62/9 पैकी | 0.0500 | 0.0005 |
| 6 | 62/11 पैकी | 0.2280 | 0.1800 |
| 7 | 63/1 | 0.1900 | 0.1900 |
| 8 | 63/2 | 0.2800 | 0.2800 |
| 9 | 63/3 | 0.0300 | 0.0300 |
| 10 | 63/4 | 0.0500 | 0.0500 |
| 11 | 63/5 | 0.1700 | 0.1700 |
| 12 | 63/6 | 0.2000 | 0.2000 |
| 13 | 63/7 | 0.2400 | 0.2400 |
| 14 | 63/8 | 0.5400 | 0.5400 |
| 15 | 63/9 | 0.0400 | 0.0400 |
| 16 | 63/10 | 0.1300 | 0.1300 |
| 17 | 63/11 | 0.1000 | 0.1000 |
| 18 | 63/12 | 0.0700 | 0.0700 |
| 19 | 63/13 | 0.3800 | 0.3800 |
| 20 | 63/14 | 0.1500 | 0.1500 |
| 21 | 63/15 | 0.1600 | 0.1600 |
| 22 | 63/16 | 0.2400 | 0.2400 |
| 23 | 63/17 | 0.1000 | 0.1000 |
| 24 | 63/18 | 0.0700 | 0.0700 |
| 26 | 63/20 | 0.0600 | 0.0600 |
| 27 | 63/21 | 0.0500 | 0.0500 |
| 28 | 63/22 पैकी | 0.0700 | 0.0660 |
| 29 | 63/23 पैकी | 0.1000 | 0.0215 |
| 30 | 63/25 पैकी | 0.61.00 | 0.1435 |
| 31 | 63/32 पैकी | 0.7000 | 0.4530 |
| 32 | 63/6 पैकी | 0.8740 | 0.2640 |
| 33 | 65/9 | 0.1400 | 0.1400 |
| 34 | 65/10 | 0.0830 | 0.0830 |
| 35 | 66/6 पैकी | 1.2200 | 0.0500 |
| 36 | 66/7 पैकी | 0.6700 | 0.2700 |
| 37 | 66/9 पैकी | 0.0800 | 0.0160 |
| 38 | 69/1 | 0.3400 | 0.3400 |
| 39 | 69/2 पैकी | 2.1900 | 2.1000 |
| 40 | 69/4 पैकी | 0.5900 | 0.1880 |
| 41 | 69/5 पैकी | 0.5900 | 0.1350 |
| 42 | 69/6 पैकी | 0.6000 | 0.1270 |
| 43 | 69/7 पैकी | 0.8300 | 0.1440 |
| 44 | 69/8 | 0.2400 | 0.2400 |
| 45 | 69/9 | 0.1300 | 0.1300 |
| 46 | 69/10 | 0.0400 | 0.0400 |
| 47 | 69/11 | 0.2700 | 0.2700 |
| 48 | 69/12 | 0.1300 | 0.1300 |
| 49 | 69/13 | 0.0300 | 0.0300 |
| 50 | 69/14 | 0.0200 | 0.0200 |
| 51 | 69/15 | 0.0200 | 0.0200 |
| 52 | 69/16 | 1.0800 | 1.0800 |
| 53 | 69/17 | 0.0700 | 0.0700 |
| 54 | 69/18 पैकी | 0.5300 | 0.4000 |
| 55 | 69/20 पैकी | 0.5100 | 0.0820 |
| 56 | 70/1 | 0.0370 | 0.0370 |
| 57 | 70/2 | 0.1300 | 0.1300 |
| 58 | 71/1 | 0.0800 | 0.0800 |
| 59 | 71/2 | 0.2300 | 0.2300 |
| 60 | 71/3 | 0.1500 | 0.1500 |
| 61 | 71/4 | 0.1000 | 0.1000 |
| 62 | 71/5 | 0.1100 | 0.1100 |
| 63 | 71/6 | 0.0800 | 0.0800 |
| 64 | 71/7 | 0.1100 | 0.1100 |
| 66 | 71/9 | 0.2080 | 0.2080 |
| 67 | 71/10 | 0.2200 | 0.2200 |
| 68 | 71/11 | 0.4500 | 0.4500 |
| 69 | 71/12 | 0.1100 | 0.1100 |
| 70 | 71/13 | 0.0900 | 0.0900 |
| 71 | 71/14 | 0.0900 | 0.0900 |
| 72 | 71/15 | 0.2900 | 0.2900 |
| 73 | 71/16 | 0.4500 | 0.4500 |
| 74 | 71/17 | 0.1700 | 0.1700 |
| 75 | 71/18 | 0.1400 | 0.1400 |
| 76 | 71/19 | 0.1600 | 0.1600 |
| 77 | 71/20 | 0.2300 | 0.2300 |
| 78 | 71/21 | 0.0200 | 0.0200 |
| 79 | 71/22 | 0.0700 | 0.0700 |
| 80 | 71/23 | 0.0700 | 0.0700 |
| 81 | 71/24 | 0.1100 | 0.1100 |
| 82 | 71/25 | 0.0200 | 0.0200 |
| 83 | 71/26 | 0.0300 | 0.0300 |
| 84 | 71/27 | 0.3300 | 0.3300 |
| 85 | 71/28 | 0.1100 | 0.1100 |
| 86 | 71/29 | 0.1400 | 0.1400 |
| 87 | 71/30 | 0.0500 | 0.0500 |
| 88 | 71/31 | 0.0800 | 0.0800 |
| 89 | 71/32 | 0.4300 | 0.4300 |
| 90 | 71/33 | 0.0200 | 0.0200 |
| 91 | 71/34 | 0.0300 | 0.0300 |
| 92 | 71/35 | 0.0300 | 0.0300 |
| 93 | 71/36 | 0.0900 | 0.0900 |
| 94 | 71/37 | 0.0800 | 0.0800 |
| 95 | 71/38 | 0.1200 | 0.1200 |
| 96 | 71/39 | 0.0500 | 0.0500 |
| 97 | 71/40 | 0.0600 | 0.0600 |
| 98 | 71/41 | 0.0600 | 0.0600 |
| 99 | 71/42 | 0.0900 | 0.0900 |
| 100 | 71/43 पैकी | 0.1100 | 0.0285 |
| 101 | 71/44 पैकी | 0.0800 | 0.0240 |
| 102 | 71/45 पैकी | 0.1100 | 0.0345 |
| 103 | 71/46 | 0.0600 | 0.0600 |
| 104 | 71/47 पैकी | 0.0700 | 0.0240 |
| 106 | 71/49 | 0.0600 | 0.0600 |
| 107 | 71/50 | 0.0400 | 0.0400 |
| 108 | 71/51 | 0.0300 | 0.0300 |
| 109 | 71/52 | 0.0500 | 0.0500 |
| 110 | 71/53 | 0.1700 | 0.1700 |
| 111 | 71/54 | 0.0500 | 0.0500 |
| 112 | 71/55 | 0.0300 | 0.0300 |
| 113 | 71/65 | 0.0500 | 0.0500 |
| 114 | 71/66 | 0.0100 | 0.0100 |
| 115 | 72/1 | 0.2700 | 0.2700 |
| 116 | 72/2 | 0.2700 | 0.2700 |
| 117 | 72/3 | 0.5300 | 0.5300 |
| 118 | 72/4 | 0.1500 | 0.1500 |
| 119 | 72/5 | 0.3100 | 0.3100 |
| 120 | 72/6 | 0.0300 | 0.0300 |
| 121 | 72/7 | 0.1500 | 0.1500 |
| 122 | 72/8 | 0.2500 | 0.2500 |
| 123 | 72/9 | 0.0700 | 0.0700 |
| 124 | 72/10 | 0.0200 | 0.0200 |
| 125 | 72/11 | 0.0500 | 0.0500 |
| 126 | 72/12 | 0.1000 | 0.1000 |
| 127 | 72/13 | 0.1000 | 0.1000 |
| 128 | 72/14 | 0.0300 | 0.0300 |
| 129 | 72/15 | 0.2000 | 0.2000 |
| 130 | 72/16 | 0.1000 | 0.1000 |
| 131 | 72/17 | 0.0600 | 0.0600 |
| 132 | 72/18 | 0.0700 | 0.0700 |
| 133 | 72/19 | 0.0800 | 0.0800 |
| 134 | 72/20 | 0.0600 | 0.0600 |
| 135 | 72/21 | 0.1400 | 0.1400 |
| 136 | 72/22 | 0.1600 | 0.1600 |
| 137 | 72/23 | 0.03 | 0.03 |
| 138 | 72/24 | 0.0400 | 0.0400 |
| 139 | 72/25 | 0.0600 | 0.0600 |
| 140 | 72/26 | 0.1000 | 0.1000 |
| 141 | 72/27 | 0.0400 | 0.0400 |

पान ७ वर

# नवी मुंबईच्या विकासाला मिळणार चालना

## आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडून २४ कोटींचा प्रस्ताव सादर



**नवी मुंबई : प्रतिनिधी , बातमीदार**

बेलापूर विधानसभा मतदारसंघातील सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी विविध विकासकामांचे प्रस्ताव शासनाकडे सादर करून त्यासाठी एकूण २४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे. यामध्ये बेलापूर गावात २० कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक इन्डोअर स्पोर्ट्‌र्स कॉम्प्लेक्स, पाम बीच मार्गालगत २ कोटी रुपये खर्चून बटरफ्लाय पार्क, दिवाळे गावात १ कोटी रुपये खर्चून १० खाटांचे अद्ययावत प्राथमिक आरोग्य केंद्र, तसेच बेलापूर गावातील स्मशानभूमीच्या अद्ययावतीकरण व सुशोभीकरणासाठी १ कोटी रुपये अशा विविध महत्त्वपूर्ण कामांचा समावेश आहे.

बेलापूर गावातील नवी मुंबई मनपा पर्यावरण प्रयोगशाळेमागील भूखंडावर खेळाडू आणि नागरिकांसाठी सर्व सुविधायुक्त इन्डोअर स्पोर्ट्‌र्स कॉम्प्लेक्स उभारण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी नगरविकास विभागामार्फत २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संकुलामुळे खेळाडूंना विविध क्रीडा प्रकारांच्या सरावासाठी तसेच जागतिक दर्जाच्या ऑलिम्पिक स्पर्धांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहे.

सारसोळे जंक्शन, पाम बीच मार्गालगतच्या भूखंडावर बटरफ्लाय पार्क विकसित करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. यासाठी पर्यटन विभागामार्फत २ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या उद्यानामुळे नवी मुंबईच्या सौंदर्यात भर पडण्यासोबतच पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना मिळणार आहे.

दिवाळे गावाचा 'स्मार्ट व्हिलेज'च्या धर्तीवर विकास करण्याच्या दृष्टीने नागरिकांना स्थानिक पातळीवर दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १० खाटांचे अद्ययावत प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याचा प्रस्ताव असून, त्यासाठी १ कोटी रुपयांचा स्वतंत्र निधी मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. या आरोग्य केंद्रामुळे दिवाळे गाव व परिसरातील नागरिकांना प्राथमिक उपचार आणि आरोग्यसेवा अधिक सुलभपणे उपलब्ध होणार आहेत.

यासोबतच बेलापूर गावातील स्मशानभूमीचे अद्ययावतीकरण, सुशोभीकरण व आवश्यक मूलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी १ कोटी रुपयांचा स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. स्मशानभूमी परिसर अधिक स्वच्छ, सुसज्ज आणि नागरिकांसाठी आवश्यक सुविधांनी युक्त करण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासनाकडून या विकासकामांना सकारात्मक मंजुरी मिळून बेलापूर व दिवाळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केला आहे.असून, या माध्यमातून बेलापूर व दिवाळे गावातील क्रीडा, आरोग्य, पर्यावरण, पर्यटन आणि नागरी सुविधांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

### सीकेटी इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागात

# पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीची कार्यशाळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसात रुजविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझी वसुंधरा अभियान ७.०' अंतर्गत 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा' हा अभिनव उपक्रम दि. ९ सप्टेंबर रोजी राबविण्यात आला.

या उपक्रमांतर्गत पद्मजा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील इयत्ता चौथीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.सदर उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी बनविलेल्या बाप्पाच्या मूर्तींचे शाळेच्या शिक्षिका स्नेहल कडव यांनी काटेकोर परीक्षण केले.पर्यावरणाचा समतोल राखत पारंपरिक श्रद्धा आणि आधुनिक पर्यावरण-जागर यांचा सुंदर मिलाफ साधणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता .

शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देऊन 'प्लास्टर ऑफ पॅरिसला नकार, पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा स्वीकार' असा सकारात्मक संदेश देण्यात आला त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, जलप्रदूषण रोखणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन आणि सामाजिक जबाबदारी यांविषयी जागरूकता निर्माण व्हावी म्हणून पर्यावरणाच्या संवर्धनाच्या दृष्टिकोनातून प्रतिज्ञा घेण्यात आली.सदर कार्यक्रमासाठीइन्फिनिटी फाउंडेशनचे अध्यक्ष अयुफ अखुला, पद्मजा कुलकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे उपस्थित होते.

# कसळखंड ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी स्वाती पाटील बिनविरोध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कसळखंड ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या निवडणुकीत आष्टे गावातील भाजपच्या स्वाती गिरीश पाटील यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर ग्रामस्थ व समर्थकांनी गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष केला.

कसळखंड ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत कसलखंड, आष्टे, अरिवली, शिवाजीनगर आणि फणसवाडी या गावांचा समावेश आहे. उपसरपंचपदाच्या निवडीसाठी ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपच्या सदस्य स्वाती पाटील यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली.

निवडीनंतर ९ जुलै रोजी सरपंच संजय घरत यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयात स्वाती पाटील यांनी उपसरपंचपदाचा पदभार स्वीकारला. यावेळी सत्काराला उत्तर देताना नवनियुक्त उपसरपंच स्वाती पाटील म्हणाल्या, ग्रामपंचायतीचे सरपंच, सर्व सन्माननीय सदस्य आणि ग्रामस्थांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला मी पूर्णपणे पात्र ठरण्याचा प्रयत्न करेन. ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य तसेच महिलांच्या सक्षमीकरणाच्या कामांना सर्वांना सोबत घेऊन गती देणार आहे.

# 'रयत'च्या मार्केट यार्ड विद्यालयात कृतज्ञता सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयतच्या न्यू इंग्लिश स्कूल, मार्केटयार्ड, पनवेल येथे विपला फाउंडेशनच्या सहकार्याने आणि ओवेन्स कॉर्निंग इंडिया प्रा. लि. च्या सीएसआर निधीतून विद्यालयास मिळालेल्या विविध शैक्षणिक सुविधांसाठी कृतज्ञता सोहळा मंगळवार, दिनांक ०८ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला.

या कृतज्ञता सोहळ्यास अर्चना परेश ठाकूर, सामाजिक कार्यकर्त्या; ओवेन्स कॉर्निंग इंडिया प्रा. लि. च्या वतीने विनोद काळे (इंडिया एचआर लीडर), संतोष पाटील (सोर्सिंग लीडर), डॉ. भालचंद्र पेढांबकर (सीएसआर लीडर), राजू गावंड (क्वालिटी इंजिनीअर), सागर खरात (सीएसआर प्रोग्राम को-ऑर्डिनेटर) उपस्थित होते. तसेच, विपला फाउंडेशनच्या वतीने प्रमोद निगुडकर (सीईओ), श्रुती गवंडी (अ‍ॅडमिनिस्ट्रेशन हेड), संदेश शेलार (आयटी एक्झिक्युटिव्ह), मनोज पुत्तर (एज्युकेशन डायरेक्टर), आणि माजी विद्यार्थी संघटना उपाध्यक्ष. कल्पेश मोहोकर, रेखा म्हात्रे, व ज्योती खुटले यांची उपस्थिती होती.

उत्तम शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने, ओवेन्स कॉर्निंग इंडिया प्रा. लि. च्या सीएसआर निधीतून शाळा सुरक्षा व मुलांचे संरक्षण अंतर्गत संपूर्ण संच्यासह १२ सीसीटीव्ही कॅमेरे, ४ अग्निशामक नळकांडे, विद्यार्थ्यांसाठी ५० उच्च दर्जाचे बेंचेस, ८ फळे, १० भिंतीवरील पंखे, १३ ट्यूबलाइट्स, २ संगणक व १ लॅपटॉप, स्टाफ रूमसाठी १२ खुर्च्या, ६ कपाटे, १ कलर प्रिंटर, आणि कचराकुंडी या वस्तूंचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांच्या बॅचला प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम. एम. पाटील यांनी केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक. डी. सी. पाटील यांनी विद्यालयास मिळालेल्या शैक्षणिक सुविधांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, तसेच या सुविधांमुळे विद्यालयाच्या भौतिक सोयीसुविधांमध्ये मोलाची भर पडल्याचे नमूद केले. अनुष्का थोरात आणि मनिषा चौधरी या दोघींनी विद्यार्थ्यांच्या वतीने सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल धन्यवाद दिले. माजी विद्यार्थी राजू गावंड यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत आपल्या शाळेच्या ऋणात राहण्याबाबत मार्गदर्शन केले. ठाकूर इ. एम. सर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सीकेटी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांना नारी शक्ती पुरस्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय सेनेचे अद्‌वितीय शौर्य, पराक्रम आणि अमर बलिदानाच्या गौरवशाली परंपरेला समर्पित राष्ट्रीय पुरस्कार समारोह तथा अखिल भारतीय प्रतिभा महासंमेलन' नुकतेच शिर्डी येथे झाले. या सोहळ्यात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालय, इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा नरेंद्र शिंदे यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत नारी शक्ती पुरस्काराने सन्मानाने गौरविण्यात आले.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या प्रतिभावंतांचा सन्मान करण्यात आला. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाइस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ. एस.टी. गडदे, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या संचालिका वर्षा ठाकूर, सदस्य अ‍ॅड. राहुल घरत तसेच स्वप्नील ठाकूर आणि इतर सर्व मान्यवर; त्याचबरोबर विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिंदे यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# पनवेल मनपात लोकशाही दिनानिमित्त नागरिकांच्या तक्रारींचे निवारण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडवण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवारी (दि. ७) आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे, शहर अभियंता राजेश कर्डिले, सामान्य प्रशासन विभागप्रमुख कीर्ती महाजन, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी विविध विभागांतील एकूण दोन अर्ज दाखल झाले होते. या अर्जांची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडवण्यात आल्या. महापालिकेत दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे १५ दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# खारघरमध्ये अज्ञात वाहनाच्या धडकेत दोघे जखमी

**पनवेल** : मुंबई-पुणे महामार्गावरील खारघर येथील बेलपाडा बसस्थानकाजवळ भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत दोन तरुण जखमी झाल्याची घटना घडली. अपघातानंतर जखमींना मदत न करता तसेच पोलिसांना माहिती न देता संबंधित वाहनचालक वाहनासह पसार झाला.या अपघातात यश चव्हाण आणि अनिरुद्‌ध सुरेश बागडे (दोघेही रा. दिवाळे गाव) हे जखमी झाले आहेत. दोघेही दिवाळे येथून बेलपाडा, खारघर येथील महाविद्यालयात जात होते.



नवी मुंबई : येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष, ढोल-ताशांचा गगनभेदी गजर, गुलालाची उधळण आणि हजारो भक्तांचा प्रचंड उत्साह अशा भक्तिमय वातावरणात नवी मुंबईचे आकर्षण मानल्या जाणाऱ्या ऐरोलीच्या राजाचे थाटामाटात आगमन झाले.

# पनवेलच्या विरुपाक्ष मंदिरात श्रावण संगीतोत्सव; २४ कलाकारांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रावण मासाचे औचित्य साधून पनवेलमधील प्रसिद्ध आणि प्राचीन श्री विरुपाक्ष महादेव मंदिरात संगीतमय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विरुपाक्ष देवस्थान ट्रस्टचे सचिव गुरुनाथ उर्फ संदीप लोंढे यांच्या संकल्पनेतून १३ ऑगस्ट ते १० सप्टेंबर या काळात श्रावण सोमवार वगळून रोज सायंकाळी ७ ते ७.३० या वेळेत ही वादन सेवा पार पडत आहे.

या उपक्रमातून २४हून अधिक संगीत कलाकार महादेवाच्या चरणी आपली कला सादर करीत आहेत. यात सनई, संवादिनी, तबला, पखवाज, सतार, संतूर, व्हायोलिन आणि बासरी यांसारख्या विविध वाद्यांचे वादन व साथसंगत करणारे कलाकार सहभागी झाले आहेत.

या संगीतोत्सवाचे आयोजन व नियोजन किरण बापट यांनी केले असून देवस्थानचे अध्यक्ष श्रीनंद पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली व ट्रस्टच्या सर्व सदस्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम सुरू आहे.

नवीन वादक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. महिनाभर चालणाऱ्या संगीत सोहळ्याचा सांगता सोहळा १० सप्टेंबर रोजी पंडित शैलेश भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा होणार असून संगीत रसिकांनी या वादनसेवेला आवर्जून उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

रामप्रहर

श्रावणधारा

## श्रावण महिना

आला श्रावण महिना
ओल्या चिंब अंगणात
मन अलगुज गाते
निसर्गाच्या या रंगात
काय वर्णू हा महिमा
धरणी होते ओली चिंब
पाना पानांतून वाहती
दवबिंदूंचे ओले टिंब
श्रावणात उडे रोज
सणावारांची धांदल
धरणी पांघरे हिरवी शाल
जमे मस्त वाऱ्याची मैफल
वृक्ष वेली लगडल्या
येई फुलांचा सुगंध
आसमंतात दरवळतो
प्राजक्ताचा गंध बेधुंद



विजय दत्तात्रेय गायकर
पनवेल-रायगड


# ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलियाचा 'ए' संघ सप्टेंबर ते ऑक्टोबरदरम्यान भारत दौऱ्यावर येत असून या दौऱ्यासाठी भारतीय नियामक क्रिकेट मंडळाने (बीसीसीआय) भारतीय 'ए' संघाची अधिकृत घोषणा केली आहे. तरुण आणि अनुभवी खेळाडूंचा समतोल साधत बीसीसीआयने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या या महत्त्वपूर्ण मालिकेसाठी वेगवेगळ्या फॉरमॅटनुसार दोन संघ मैदानात उतरवले आहेत.

या दौऱ्यात दोन चारदिवसीय बहुदिवसीय (मल्टी-डे) सामने आणि तीन एकदिवसीय सामने खेळवले जाणार आहेत. आगामी मालिकेचे गांभीर्य लक्षात घेता निवड समितीने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक प्रमुख खेळाडूंना संघात संधी दिली आहे. त्यानुसार एकदिवसीय मालिकेची धुरा महाराष्ट्राचा फलंदाज ऋतुराज गायकवाड याच्याकडे सोपवण्यात आली असून चारदिवसीय

## देवदत्त-ऋतुराज कर्णधारपदी




सामन्यांसाठी देवदत्त पडिक्कलकडे कर्णधारपद देण्यात आले आहे.

या दौऱ्याची सुरुवात २२ सप्टेंबरपासून होणार असून सर्व लढती पुद्दुचेरी येथे खेळवल्या जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात २२ ते २५ सप्टेंबरदरम्यान पहिला चारदिवसीय सामना रंगणार असून दुसरा सामना २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत पार पडेल. कसोटी प्रारूपाप्रमाणे खेळवल्या जाणाऱ्या या सामन्यांमध्ये सध्या उत्कृष्ट लयीत असलेला देवदत्त पडिक्कल भारतीय संघाचे नेतृत्व करेल.

यानंतर ५० षटकांच्या तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका रंगणार आहे. या मालिकेतील पहिला सामना ६ ऑक्टोबर रोजी, दुसरा सामना ९ ऑक्टोबर रोजी तर तिसरा आणि अंतिम सामना ११ ऑक्टोबर रोजी होईल. जरी हे सामने ५० षटकांचे असले तरी त्यांना अधिकृत आंतरराष्ट्रीय दर्जा नसेल.

निवड समितीने जाहीर केलेल्या चारदिवसीय संघात अमन मोखाडे, आयुष पांडे, देवदत्त पडिक्कल (कर्णधार), साई सुदर्शन (उपकर्णधार), यश राठोड, शेख रशीद, कुमार कुशाग्र, शम्स मुलानी, तनुष कोटियन, तुषार देशपांडे, अंशुल कंबोज, प्रफुल हिंगे, एन. जगदीशन, नचिकेत भुते आणि व्ही. वैशाख (तंदुरुस्तीच्या अधीन) यांना स्थान मिळाले आहे.

एकदिवसीय मालिकेसाठी प्रियांश आर्य, साई सुदर्शन, देवदत्त पडिक्कल (उपकर्णधार), ऋतुराज गायकवाड (कर्णधार), रजत पाटीदार, कुमार कुशाग्र, निशांत सिंधू, विप्रज निगम, अर्शिन कुलकर्णी, अर्शद खान, नमन धीर, हार्दिक पांड्या (तंदुरुस्तीच्या अधीन), प्रभसिमरन सिंग, गुरजपनीत सिंग आणि यश ठाकूर यांचा समावेश करण्यात आला आहे.

### हार्दिक पांड्याचे पुनरागमन

दुखापतीमुळे दीर्घकाळ राष्ट्रीय संघाबाहेर असलेला अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या याला एकदिवसीय संघात स्थान देण्यात आले आहे, ही या निवडीतील लक्षवेधी बाब ठरली आहे, मात्र त्याच्या नावापुढे विशेष खूण करण्यात आली असून त्याचे मैदानावरील खेळणे हे केवळ त्याच्या शारीरिक तंदुरुस्तीवर (फिटनेस) अवलंबून असणार आहे. अशीच अट चारदिवसीय सामन्यांसाठी निवड झालेल्या विजयकुमार वैशाख याच्या बाबतीतही लागू करण्यात आली आहे.

# महिला आशिया चषक स्पर्धेत आज भारत-बांगलादेश पहिली सेमीफायनल

**दुबई : वृत्तसंस्था**

महिला आशिया चषक स्पर्धेतील विजेतेपदाची शर्यत आता अखेरच्या टप्प्यावर जाऊन पोहचली आहे. बांगलादेश आणि युएई यांच्यातील अखेरच्या गट टप्प्यातील सामन्यानंतर आशिया चषकातील सेमीफायनलचे चार संघ ठरले आहेत. त्यानुसार भारत आणि बांगलादेश यांच्यात १० सप्टेंबरला पहिला उपांत्य सामना खेळवला जाणार आहे.

उपांत्य सामन्यांचा समावेश असलेली बाद फेरी (नॉकआउट स्टेज) १० सप्टेंबरपासून सुरू होत आहे. या स्पर्धेत दोन गट होते. अ गटामध्ये भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहिला, तर पाकिस्तानने चार गुणांसह दुसरे स्थान पटकावले. दुसरीकडे ब गटामध्ये श्रीलंकेने अव्वल स्थान मिळवले आणि बांगलादेश




दुसऱ्या स्थानावर राहिला.

आशिया चषकाचा पहिला उपांत्य सामना भारत आणि बांगलादेश यांच्यात दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. या सामन्यातील विजेता संघ अंतिम फेरीत प्रवेश करेल. ११ सप्टेंबर रोजी दुसऱ्या उपांत्य सामन्यात श्रीलंका आणि पाकिस्तान यांच्यात लढत होईल. हा सामनाही दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जाणार आहे. दरम्यान, अंतिम सामन्यात पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान यांच्यातील लढत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# ईशान किशनचा ऐतिहासिक पराक्रम

## दुलिप ट्रॉफी फायनलमध्ये केल्या सर्वाधिक धावा

**चेन्नई : वृत्तसंस्था**

दुलीप ट्रॉफी २०२६ स्पर्धेतील फायनलमध्ये ईशान किशनचा शानदार शो दुसऱ्या डावातही कायम राहिला. पहिल्या डावात त्रिशतकाची संधी हुकलेल्या ईशान किशनची दुसऱ्या डावात शतकाला गवसणी घालण्याची संधी हुकली, पण ८० धावांच्या खेळीसह त्याने १६ वर्षांपूर्वीचा दिनेश कार्तिकचा विक्रम मोडीत काढत नवा इतिहास रचला आहे.

दुलीप ट्रॉफीच्या फायनलमध्ये ईशान किशनने पहिल्या डावात २७० धावांची शानदार खेळी केली होती. त्याच्या या खेळीच्या जोरावर पूर्व विभाग संघाने पहिल्या डावात ७०८ धावांचा मोठा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करताना दक्षिण विभाग संघाचा पहिला डाव अवघ्या ३३६ धावांत आटोपला. त्यानंतर पूर्व विभागाने दुसऱ्या डावाला सुरुवात केली. अभिमन्य ईश्वरन आणि वैभव सूर्यवंशी दुहेरी आकडाही न गाठता माघारी फिरले. मग कर्णधार ईशान किशन याने आपला



फॉर्म कायम ठेवत आणखी एक रेकॉर्ड ब्रेक खेळी केली.

दक्षिण विभाग संघाला फॉलोऑन न देता ईशान किशन याने दुसऱ्यांदा फलंदाजीला उतरण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या डावात ईशान किशनने ८० धावांची खेळी केली. त्याने ९८ चेंडूंचा सामना करताना नऊ चौकार आणि तीन षटकार लगावले. पहिल्या डावातील २७० आणि दुसऱ्या डावातील ८० धावा मिळून ईशानने या सामन्यात ३५० धावा केल्या आहेत. यासह तो दुलीप ट्रॉफीच्या फायनलमध्ये दोन्ही डावांत मिळून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे.

**दिनेश कार्तिकचा विक्रम मोडला**

याआधी फायनलमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम दिनेश कार्तिकच्या नावावर होता. २०१०मध्ये दक्षिण विभागाच्या संघाकडून खेळताना पश्चिम विभागाविरुद्ध कार्तिकने एकूण ३३३ धावा केल्या होत्या. पहिल्या डावात त्याने १८३ धावा, तर दुसऱ्या डावात १५० धावांची खेळी केली होती. तब्बल १६ वर्षांनंतर ईशान किशनने दिनेश कार्तिकचा हा विक्रम मोडला आहे. विशेष म्हणजे, ईशान किशन आणि दिनेश कार्तिक हे दोघेही यष्टिरक्षक-फलंदाज आहेत.

# तिलक वर्माचे शतक अवघ्या एका धावेने हुकले

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नईतील चेपॉकच्या मैदानात सुरू असलेल्या दुलीप ट्रॉफी स्पर्धेतील फायनलमध्ये दक्षिण विभागाचा कर्णधार तिलक वर्माने एकहाती किल्ला लढवण्याचा प्रयत्न केला. रेड बॉल क्रिकेटमधील दमदार फॉर्म कायम ठेवताना त्याने संघाकडून सर्वाधिक धावा केल्या, पण चौथ्या दिवसाच्या खेळात अवघ्या एका धावेने शतक हुकले. तो ९९ धावांवर बाद झाला.

ईशान किशनच्या पूर्व विभाग संघान पहिल्या डावात तब्बल ७०८ धावांचा डोंगर उभारल्यानंतर दक्षिण विभागाच्या संघावर मोठे दडपण होते. संघाची अवस्था ९ बाद ३३६ अशी असताना तिलक आपले सलग दुसरे शतक झळकावण्याच्या उंबरठ्यावर होता, मात्र शतकासाठी आवश्यक धाव घेण्याच्या प्रयत्नात त्याने चेंडू मैदानाबाहेर पाठवण्याचा प्रयत्न केला. त्याचा फटका थेट ऑफस्पिनर कौनेन कुरैशीच्या हातात गेला आणि तिलक झेलबाद झाला.

या स्पर्धेत पहिल्यांदाच दक्षिण विभागाचे नेतृत्व करणारा २३ वर्षीय तिलक वर्मा २०२३मध्ये दुलीप ट्रॉफीमध्ये पदार्पण केल्यानंतर अवघ्या सहा सामन्यांत तिसऱ्या शतकाच्या जवळ पोहचला होता, पण त्याच्यावर ९९ धावांवर बाद होण्याची नामुष्की ओढावली. यासह दक्षिण विभागाचा डाव ३३६ धावांवर आटोपला.

# 'एमसीए'च्या परीक्षेत रायगडचे चार पंच उत्तीर्ण

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या (एमसीए) वतीने आयोजित करण्यात आलेल्या अंतिम पंच परीक्षेचा निकाल काल जाहीर करण्यात आला असून रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे (आरडीसीए) चार पंच यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत.



उरणमधील सुरेश म्हात्रे, रवींद्र म्हात्रे, अलिबागचे अभिजित वाडकर आणि रसायनीचे निशांत माळी यांनी एमसीए प्रमाणित पंच होण्याचा मान मिळवला आहे. रायगड जिल्ह्यात क्रिकेट खेळाचा स्तर उचविण्यासाठी आरडीसीएकडून पंचांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. हे प्रशिक्षण शिबिर ऑनलाईन व प्रत्यक्ष कार्यशाळेच्या माध्यमातून घेण्यात आले असून एमसीएच्या पंच परीक्षेसाठीच्या पूर्वतयारीकरिता ही शिबिरे उपयुक्त ठरली आहेत.

गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत रायगड जिल्ह्यात एमसीए प्रमाणित १८ पंच तयार झाले आहेत. जिल्ह्यातील सर्व पंचांना प्रशिक्षण शिबिरासाठी मुख्य प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा, माजी रणजीपटू व विद्यमान बीसीसीआय पंच हर्षद रावले, रूपेश खडगी, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे पंच राजन कसबे यांनी बहुमूल्ये योगदान दिले. एमसीए पंच परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व पंचांचे आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# वुशू स्पर्धेत रोह्यातील खेळाडूंचे सुयश; राज्यस्तरावर निवड



**धाटाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे नुकतेच रायगड जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत रोहा वुशू ट्रेनिंग क्लबच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत आपला दबदबा कायम ठेवला.

महाराष्ट्र वुशू असोसिएशनच्या मान्यतेने पार पडलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत जिल्ह्यातील विविध वुशू प्रशिक्षण केंद्रांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या स्पर्धेत रोहा वुशू ट्रेनिंग क्लबचे खेळाडूंनी पदकांची लयलूट केली. यामध्ये पृथ्वी कोळी, आरूष सानप, अनुप नाकते, शौर्य धामणसे, स्वरूप गोरीवले, रितीशा कोळी, अनुष्का नाकते, युतीश बारटक्के यांनी सुवर्णपदक; सात्विक बिरगावले, जुई मोरे, देवस्वी पाटील, साई सगाटे, सिद्धी सगाटे, श्लोक काळुंके, साहिल कुशवाहा, स्पर्श चौलकर यांनी रौप्यपदक; तर क्षितीज गावडे, स्वरा अवसरे, स्वरा सानप, विधान धार्वे यांनी कांस्यपदक पटकाविले. या खेळाडूंना रोहा वुशू ट्रेनिंग क्लबचे प्रशिक्षक राकेश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले.

विजेत्या खेळाडूंना पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या यशाबद्दल रायगड वुशू असोसिएशनचे सचिव दत्ता पाटील, उपाध्यक्ष मंदार चवरकर तसेच दिनेश माळी, दीपक माळी, राकेश पाटील, श्रीकांत ठाकूर, अक्षय भगत, रंजीत रेवाळे, वृषाल गोवर्धने यांच्यासह सर्व प्रशिक्षक व पदाधिकाऱ्यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# भारताचे दोन संघ एकाच दिवशी मैदानात उतरणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी जपानला रवाना होणार आहे. याच कालावधीत टीम इंडिया घरच्या मैदानावर वेस्ट इंडिजविरुद्ध वनडे सामन्यांची मालिका खेळणार आहे. म्हणजे २८ वर्षांनंतर पहिल्यांदाच एकाच दिवशी भारताचे दोन सामने खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहेत.

भारताचा टी-२० संघ आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी जपानमध्ये असताना वेस्ट इंडिजचा संघ तीन वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी भारत दौऱ्यावर येणार आहे. ३ ऑक्टोबरला भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तिसरा वनडे सामना खेळवला जाणार आहे. हा सामना न्यू चंदीगडच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. या सामन्यात शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ वेस्ट इंडिजचा



सामना करताना दिसेल, तर याच दिवशी श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ आशियाई क्रीडा स्पर्धेत पदकासाठी झुंज देताना दिसून येणार आहे.

बीसीसीआयकडून आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. या संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी श्रेयस अय्यरकडे सोपवण्यात आली आहे. या संघात असे काही खेळाडू आहेत, जे वनडे संघाचादेखील भाग आहेत, पण ज्या खेळाडूंना आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी संघात स्थान देण्यात आले आहे, ते खेळाडू वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या वनडे मालिकेत खेळताना दिसून येणार नाहीत. त्यामुळे वनडे मालिकेसाठी युवा खेळाडूंना संधी दिली जाऊ शकते.

**२८ वर्षांनंतर पुन्हा योगायोग**

३ ऑक्टोबर हा दिवस भारतीय क्रिकेटसाठी खास असणार आहे. कारण २८ वर्षांनंतर पहिल्यांदाच दोन संघ मैदानात उतरण्याचा विशेष योगायोग जुळून येणार आहे. याआधी १२ सप्टेंबर १९९८ साली भारताचे दोन संघ एकाच दिवशी मैदानात उतरले होते. अजय जडेजाच्या नेतृत्वाखाली खेळणारा एक संघ कॉमनवेल्थ गेम्ससाठी मलेशियाला गेला होता. या सामन्यात भारतीय संघाने कॅनडाला ११२ धावांनी पराभूत केले, तर आणखी एक संघ कॅनडामध्ये पाकिस्तानचा सामना करण्यासाठी मैदानात उतरला होता. या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर सहा गडी राखून विजयाची नोंद केली.

# अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाचा व्हिडीओ चर्चेत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात तीन सामन्यांची टी-२० मालिका भारतात खेळवली जाणार आहे. अफगाणिस्तान संघाकडे या मालिकेसाठी यजमानपद असणार आहे आणि हे सर्व सामने दिल्लीत खेळवले जातील. म्हणजेच टीम इंडिया आपल्या घरच्याच मैदानावर पाहुणा संघ म्हणून खेळणार आहे. यादरम्यान अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने एक व्हिडीओ शेअर केला आहे, जो चर्चेचा विषय ठरला आहे.

बीसीसीआयने शेअर केलेला हा व्हिडीओ दोन्ही संघांमधील मालिकेची झलक (टीझर) आहे. व्हिडीओच्या साधारण ४०व्या सेकंदाला एक ॲनिमेटेड पृथ्वीगोल दिसतो, ज्यामध्ये भारत आणि अफगाणिस्तानचे नकाशे अधोरेखित केले आहेत. सर्वात आधी अफगाणिस्तानचा व नंतर भारताचा नकाशा या पृथ्वीगोलावर दाखवण्यात आला. यामध्ये संपूर्ण काश्मीर हा भारताचा भाग म्हणून दर्शवण्यात आला आहे; अगदी पाकिस्तानच्या प्रशासनाखालील काश्मीरचा भागही भारताचाच भाग असल्याचे यात दाखवले आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात काश्मीरवरून अनेक दशकांपासून संघर्ष सुरू आहे. १९४७मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पाकिस्तानने काश्मीरचा काही भाग बळकावला, जो 'पाकिस्तान-व्याप्त काश्मीर' (पीओके) म्हणून ओळखला जातो. दरम्यान, काश्मीरचा उर्वरित भाग हा भारताचा अविभाज्य भाग आहे, तरीही संपूर्ण प्रदेश आपलाच असल्याचा दावा पाकिस्तान सातत्याने करत असतो.

भारतीय क्रिकेट संघ अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार असून या मालिकेचे यजमानपद अफगाणिस्तानकडे असेल. हे सर्व सामने दिल्लीतील अरुण जेटली क्रिकेट स्टेडियमवर १३, १५ आणि १७ सप्टेंबर रोजी सायंकाळी खेळवले जाणार आहेत.

# अमेरिकन टेनिस स्पर्धेत मानांकित महिला खेळाडूंची घोडदौड

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

यंदाच्या अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेतील महिला एकेरीत मानांकित खेळाडूंनी घौडदौड कायम राखली आहे. अव्वल सहाही खेळाडूंनी उपांत्यपूर्व फेरी गाठत जेतेपदासाठी चुरस निर्माण केली असून त्यातही एलिना रायबाकिनाचा नाओमी ओसाकावरील विजय लक्षवेधी ठरला. पुरुष गटातून अव्वल १०पैकी केवळ तीनच मानांकित खेळाडू आपले आव्हान राखू शकले आहेत.

महिला गटातून अग्रमानांकित अरिना सबालेन्का, दुसरी मानांकित रायबाकिना, तिसरी मानांकित जेसिका पेगुला, चौथी मानांकित कोको गॉफ, पाचवी मानांकित मीरा आंद्रीवा आणि सहावी मानांकित लिंडा नोस्कोव्हा, तर पुरुष गटातून अग्रमानांकित ॲलेक्झांडर झ्वेरेव,



दुसरा मानांकित कार्लोस अल्कराझ आणि आठवा मानांकित बेन शेल्टन अजूनही स्पर्धेत आहेत.

रायबाकिनाने चार वेळच्या ग्रँडस्लॅम विजेत्या जपानच्या नाओमी ओसाकाचा ६-१, ६-४ असा सहज पराभव केला. या विजयामुळे जागतिक क्रमवारीतील अग्रस्थान रायबाकिनाच्या दृष्टिक्षेपात आले आहे, मात्र हे स्थान गाठण्यासाठी तिला उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या किनवेन झेंग हिची स्वप्नवत आगेकूच रोखावी लागेल.

उपउपांत्यपूर्व फेरीत झेंगने आठव्या मानांकित इगा श्वीऑटेकला ७-५, ६-३ असा पराभवाचा धक्का दिला. अमेरिकेच्या माजी विजेत्या कोको गॉफने आपलीच देशवासीय चौदाव्या मानांकित इव्हा जोविचचे आव्हान ६-१, ६-४ असे परतवून लावले. मीरा आंद्रिवाने २४व्या मानांकित ॲनास्तासिया पोटापोवाचा ५-७, ६-४, ६-३ असा पराभव केला. आता उपांत्यपूर्व फेरीत गॉफ आणि आंद्रीवा या अनुक्रमे चौथे आणि पाचवे मानांकित मिळालेल्या खेळाडू आमनेसामने येणार आहे.

# पाकिस्तानच्या आणखी एका खेळाडूवर आयसीसीची कारवाई

**दुबई : वृत्तसंस्था**

महिला आशिया चषक स्पर्धेत हाँगकाँगविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानची खेळाडू गुल फिरोजा अंपायरच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित करत वादग्रस्त इशारा केला होता. त्यानंतर आयसीसीने गुल फिरोजावर कारवाई केली आहे.

याआधी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यादरम्यान पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनाने देखील वादग्रस्त सेलिब्रेशन केले होते. त्यामुळे तिच्यावरही कारवाई करण्यात आली होती.

पाकिस्तान आणि हाँगकाँग या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यादरम्यान पाचवे षटक सुरू असताना अंपायरने गुल फिरोजाला एलबीडब्ल्यू बाद घोषित केले. त्यावेळी तिने अंपायरच्या निर्णयाला विरोध दर्शवला आणि अंपायरला बॅट दाखवली. ती हे सांगण्याच्या प्रयत्न करत होती की, चेंडू पॅडला लागण्याआधी बॅटला लागला आहे. अंपायरने दिलेल्या निर्णयाचा विरोध करणे आणि वाद घालणे तिला महागात पडले आहे. आता आयसीसीने तिच्यावर कारवाई केली आहे.

गुल फिरोजाने आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.८चे उल्लंघन केले आहे. हे अंपायरने दिलेल्या निर्णयाला विरोध दर्शवण्याशी संबंधित आहे. त्यामुळे आयसीसीने तिच्यावर कारवाई केली असून तिच्या मॅच फीवर १० टक्के दंड आकारला आहे. यासह एक डिमेरिट पॉईंटही दिला आहे, कारण ही तिची पहिली चूक नाही. गेल्या २४ महिन्यात तिने केलेही ही दुसरी चूक आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com